# भारत जोडो युवा अकादमी
# व
# साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट
# संयुक्त वार्षिक अहवाल – सन 2025-26

---

**03.04.2025** **आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मौजे मांडवी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट तर्फे दिनांक 03.04.2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत मौजे मांडवी येथील बळीराम पाटील शासकीय ग्रामीण रूग्णालय येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या मोफत आरोग्य शिबीराचा एकुण 20 लाभार्थ्यांनी लाभ घेतला. त्यातील 07 रूग्णांना साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे संदर्भीत करण्यात आले. या शिबीरात डॉ. विजय काळे व डॉ. प्रगती पवार मॅडम यांनी रूग्णांची तपासणी करून मोफत औषधी उपलब्ध करून देण्यात आले. तसेच त्यांच्यासोबतीला नाव नोंदणी विभाग, कु. जयश्री गुरनुले व निकीता, स्टाफ नर्स कु. दिव्या गादेवार, श्रीमती प्रभावती वाघमारे यांच्यासह नितीन पवार, वाहनचालक नागेश देवतळे यांचे सहकार्य लाभले.

या शिबीराच्या यशस्वीयतेसाठी साने गुरूजी रूग्णालयाचे कर्मचारी व ग्रामीण रूग्णालय मांडवी येथील श्री. थोरात यांनी सहकार्य केले.

**07.04.2025** **भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयातर्फे जागतिक आरोग्य दिन साजरा**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त **भारत जोडो युवा अकादमी** आणि **साने गुरूजी रुग्णालय** यांच्या संयुक्त विद्यमाने एक प्रेरणादायी व आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढवणे व 'सर्वांसाठी उत्तम आरोग्य' या संकल्पनेचा प्रचार करणे हा होता. रेणुकादेवी नर्सिंग स्कुल, गोकुंदा येथील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून त्यातुन आरोग्य सवंर्धनाचा मोलाचा संदेश दिला.

या कार्यक्रमात आरोग्य तपासणी शिबीर, पोषणविषयक मार्गदर्शन, व्यसनमुक्तीबाबत माहिती व जनजागृतीपर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. विजय काळे यांनी उपस्थितांना आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले.

**08.04.2025** **AU Small Finance बँकेचे अमन खंडेलवाल यांची साने गुरुजी रुग्णालयाला सदिच्छा भेट**

सामाजिक बांधिलकी आणि आरोग्य सेवेचा वारसा जपणाऱ्या **साने गुरुजी रुग्णालयाला** ए.यु. स्मॉल फायनान्स बँकेचे (AU Bank) अधिकारी **श्री. अमन खंडेलवाल** यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयाच्या वतीने सुरू असलेल्या विविध उपक्रमांची आणि नवीन प्रकल्पांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

साने गुरुजी रुग्णालय ज्या सेवाभावी वृत्तीने सर्वसामान्यांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहे, त्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला व येथील मुलभुत आरोग्य सेवा सुविधांसाठी आधुनिक AU Small Finance बँकेतर्फे **पॅथॉलॉजी लॅब** उभारणीसाठी प्रयत्न करण्याचे सांगितले.

**09.04.2025** **भारत जोडो सायकल यात्री जेकब नेल्लीथेनम यांची साने गुरुजी रूग्णालयास भेट**

ऐतिहासिक 'भारत जोडो' सायकल यात्रेतील जुने स्नेही आणि सहकारी **जेकब** यांनी नुकतीच किनवट येथील **साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलला** सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे १९८० च्या दशकातील सायकल यात्रेच्या आठवणींना उजाळा मिळाला.

कन्याकुमारी ते काश्मीर (१९८५-८६) आणि इटानगर ते ओखा (१९८८-८९) या भारत जोडो सायकल यात्रांमध्ये जेकब आणि डॉ. अशोक बेलखोडे यांनी एकत्रितपणे हजारो किलोमीटरचा प्रवास करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला होता. प्रदीर्घ काळानंतर या दोन सहकाऱ्यांची भेट झाल्याने भावूक क्षण पाहायला मिळाले.

"भारत जोडो" यात्रेचा मूळ उद्देश हा 'जोडण्याचे' काम करणे हा होता. हे रुग्णालय केवळ उपचारांचे केंद्र नसून ते माणुसकी आणि सेवेच्या माध्यमातून समाजाला जोडण्याचे काम करत आहे, असे मत जेकब यांनी यावेळी व्यक्त केले

**11.04.2024** **साने गुरुजी रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी.**

साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात दिनांक 11 एप्रिल 2025 रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अशोक बेलखोडे व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याची आठवण करून देणारे विचार वाचन आणि माहितीपर भाषणे झाली.

रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले, “महात्मा फुले यांनी शिक्षण, सामाजिक समता आणि स्त्री-शिक्षणासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी समाजातील गरजूंपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवावी, हेच त्यांच्या कार्याला खरे श्रद्धांजली ठरेल.”

**13.04.2025** **माजी सनदी अधिकारी तथा लेखक श्रीकांत देशमुख यांची रूग्णालयास भेट**

माजी साखर आयुक्त साहित्य अकादमी पुस्कार विजेते लेखक तथा श्री. श्रीकांत देशमुख, नांदेड यांची साने गुरूजी रूग्णालयात डॉ. अशोक बेलखोडे यांची सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती घेतली.

**14.04.2025** **भारत जोडो युवा अकादमी तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी**

14 एप्रिल 2025 रोजी भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती साजरी करण्यात आली. रूग्णालयाच्या आवारात बाबासाहेबांच्या फोटोला पुष्पहार अर्पण केले. दीप प्रज्ज्वलीत करून पुष्पांजली अपर्ण करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे तर प्रमुख पाहूणे म्हणुन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड हे होते. कार्यक्रमाला प्रा. डॉ. पंजाब शेरे, प्रा. सोनवणे सर यांची उपस्थिती होती. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी बाबासाहेबांच्या विचारांची व कार्याची

माहिती उपस्थितांना दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक बेलखोडे यांनी बाबासाहेबांनी लिहीलेल्या घटनेने वागणे हेच मानवतेने वागणे होय आणि हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादित केले.

यावेळी रूग्णालयाचे डॉ. भाग्यश्री बेलखोडे, डॉ. विजय काळे, डॉ. प्रगती पवार, डॉ. मधुसुदन यादव, संजय बोलेनवार, मनोज चनमनवार, संदीप चनमनवार यांच्यासह रूग्णालयातील सर्व कर्मचारी आणि रूग्णाचे नातेवाईक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विकास बोलेनवार यांनी केले आणि उपस्थितांचे आभार मानले.

**15.04.2025**

**साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे विविध आधुनिक आरोग्य सुविधांचा शुभारंभ**

भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने संचलित साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे आज विविध अत्याधुनिक आरोग्य सुविधांचा शुभारंभ करण्यात आला. या सुविधांचा शुभारंभ सहाय्यक जिल्हाधिकारी श्री जेनित चंद्र दोन्तुला (भा.प्र.से) यांच्या हस्ते पार पडला.

नवीन आरोग्य सुविधांमध्ये प्रमुखपणे अत्याधुनिक रूग्णवाहीका, महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना, हाडांच्या ऑपरेशन्ससाठी सी-आर्म मशीन, मोठ्या व जटिल शस्त्रक्रियेसाठी भूल देणारी अनेस्थेशिया स्टेशन मशीन, सोनोग्राफी मशीन, आणि एकम फाऊंडेशन मुंबई यांच्या आर्थिक सहकार्याने NICU (निओनेटल इंटेन्सिव केअर युनिट) समाविष्ट आहे. यासोबतच, लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी 50% सुट योजना, तसेच व्हीजन स्प्रींग संस्थेसोबत किनवट परिसरातील गावांमध्ये नेत्ररोग तपासणी आणि माफक दरात चष्मे उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

या उद्‌घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी किनवटचे माजी नगराध्यक्ष, श्री. ईसाखान सरदार खान होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. के. पी. गायकवाड, श्री. बालाजी भिसे (तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष), आणि श्रीमती संगिता पाटील (महिला बचतगट) उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला दीपप्रज्वलन आणि साने गुरूजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सहाय्यक जिल्हाधिकारी श्री जेनित चंद्र दोन्तुला यांनी या सुविधेचे उद्‌घाटन केले आणि साने गुरूजी रूग्णालयाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रूग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी केले, तर मंचावर उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाला डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. विजय काळे, डॉ. प्रगती पवार, डॉ. मधुसुदन यादव यांच्यासह गावातील शंकरराव चाडावार, जसवंतसिंग सोखी, के. मुर्ती , प्रा. रामप्रसाद तौर, राघुमामा, प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, राजाराम गटलेवार, प्रा. उमाकांत इंगोले, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, डॉ. विकास जाधव, डॉ. उत्तम धुमाळे, डॉ. ओव्हळ, शेख अली, प्रा. डॉ. सागर शिल्लेवार, प्रा. दगडू भरकड, डॉ. शिवाजी गायकवाड, कलावती मंग्रपवाड, अनिल पाटील सुर्यवंशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार मंडळी, गावातील नागरिक यांच्यासह साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सर्व कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे यांनी केले व उपस्थितांचे आभार मानले.

**18.04.2025**

**स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या प्रतिनिधींची साने गुरुजी रुग्णालयाला सदिच्छा भेट**

सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात कार्य **साने गुरुजी रुग्णालयाला** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील **श्री. घनश्याम येळणे** यांनी डॉ. अशोक बेलखोडे यांची सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती घेतली.

याप्रसंगी त्यांच्यासोबत शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास केंद्राचे प्रभारी समन्वयक प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, प्रा. डॉ. सुनील व्यवहारे, डॉ. शिवाजी गायकवाड,डॉ. प्रवीण खंडागळे,डॉ. बाबाराव जाधव, श्री. रवींद्र गुंडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील अशा समन्वयामुळे भविष्यात सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**28.04.2025**

## परोटी तांडा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय किनवट तर्फे दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी मौजे परोटी तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च तंत्रशिक्षण, आदिवासी विकास व पर्यटन राज्यमंत्री श्री. इंद्रनील मनोहर नाईक हे प्रमुख पाहूणे म्हणुन उपस्थित होते. त्यांच्या समवेत मा. आमदार भिमरावजी केराम, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, श्रीमती बेबीताई प्रदिप नाईक, डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

साने गुरूजी रूग्णालयातर्फे डॉ. विजय काळे, डॉ. प्रगती पवार, डॉ. अक्षय केंद्रे, डॉ. मधुसुदन यादव, यांनी एकुण 59 रूग्णांची तपासणी करून मोफत औषधे दिले. साने गुरूजी रूग्णालय व व्हिजन स्प्रिंग संस्थेतर्फे 96 लाभार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करून चष्मा देण्यात आले. आरोग्यमित्र सुशिल गोखले यांनी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेबद्दल माहिती देत 07 लोकांचे आयुष्यमान कार्ड काढुन दिले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रूग्णालयाचे व्यवस्थापक संजय बोलेनवार, स्टाफ नर्स प्रभावती वाघमारे, कल्पना मेश्राम यांच्यासह लॅब टेक्निशिअन विपीन पवार, विक्की पवार, वाहनचालक नागेश देवतळे यांचे सहकार्य लाभले.

या शिबीराच्या यशस्वीयतेसाठी साने गुरूजी रूग्णालयाचे कर्मचारी व परोटी तांडा येथील श्री. मेहरसिंग चव्हाण यांच्यासह गावकऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

**01.05.2024**

## साने गुरूजी रुग्णालयात महाराष्ट्र दिन साजरा

किनवट, साने गुरूजी रुग्णालयात १ मे रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रुग्णालयातील, डॉक्टर, नर्सेस, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यानंतर उपस्थितांनी एकमुखाने 'जय महाराष्ट्र'चा गजर करत राज्यप्रेम व्यक्त केले. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेवर आधारित गीतं सादर केली.

या प्रसंगी रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी भाषणात सांगितले की, "महाराष्ट्र दिन हा आपल्या राज्याच्या प्रगतीचा, सामाजिक एकतेचा आणि सांस्कृतिक समृद्धतेचा प्रतीक आहे. आरोग्य सेवा ही देखील महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे."

**12.05.2025** **जागतिक परिचारीका दिन साजरा**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे १२ मे २०२५ रोजी **'जागतिक परिचारिका दिन'** मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आधुनिक शुश्रूषाशास्त्राच्या जनक 'फ्लोरेन्स नाइटिंगेल' यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

रुग्णालयातील सर्व परिचारिकांच्या निस्वार्थ सेवेचे कौतुक करून त्यांना गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. रुग्णांच्या सेवेसाठी त्या रात्रंदिवस करत असलेल्या कष्टाची दखल यावेळी घेण्यात आली.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांनी सांगितले की, की, डॉक्टर उपचारांचे नियोजन करतात, पण रुग्णाला खऱ्या अर्थाने बरे करण्याचे काम परिचारिकांच्या मायेच्या स्पर्शाने आणि काळजीने होते."

परिचारिकांनी यावेळी आपल्या सेवेप्रती निष्ठा राखण्याची शपथ घेतली. रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत जोडो युवा अकादमीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**12.05.2025** **साने गुरूजी रुग्णालय, येथे गौतम बुद्ध जयंती उत्साहात साजरी**

दिनांक 12 मे 2025 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे गौतम बुद्ध जयंती शांतता आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात बुद्ध वंदना घेण्यात आली आणि उपस्थितांनी बुद्धाच्या विचारांना अभिवादन केले.

कार्यक्रमासाठी रुग्णालयातील सर्व कर्मचारी, अधिकारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'बुद्धं शरणं गच्छामि'च्या गजरात वातावरण भारावून गेले.

रूग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी सांगितले की, "भगवान बुद्ध यांनी दिलेला अहिंसा, करुणा आणि शांतीचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा आहे. महात्मा गांधींना अहिंसेचा मार्ग बुध्दांकडून मिळाला आहे. या कार्यक्रमातून आपण त्यांच्या शिकवणींचा आदर्श घेऊन सेवा कार्य अधिक प्रभावीपणे करणे हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल असे सांगितले.

**29.05.2025** **श्री. किरण केंद्रे, पुणे यांची सदिच्छा भेट**

किनवट तालुक्याचे भूमिपूत्र, श्री. किरण केंद्रे, पुणे येथून प्रसिध्द होणाऱ्या **"मासिक किशोर"** चे - संपादक आज किनवट येथे साने गुरूजी रूग्णालयाला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी रूग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे यांनी शाल आणि प्रा. डॉ. सोमनाथ रोडे लिखित "आनंदवन - सेवेचे रामयण" हे पुस्तक देऊन स्वागत केले. या प्रंसगी रूग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

**30.05.2025** **डॉ. अनिल कुलकर्णी, ठाणे यांची सपत्निक साने गुरूजी रूग्णालयास भेट.**

संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांचे वर्गमित्र डॉ. अनिल कुलकर्णी भूलतज्ञ, ठाणे यांनी सपत्नीक आज किनवट येथे साने गुरूजी रूग्णालयाला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी रूग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे आणि अश्विनी उईके यांनी शाल आणि प्रा. डॉ. सोमनाथ रोडे लिखित "आनंदवन - सेवेचे रामयण" हे पुस्तक देऊन स्वागत केले. या प्रंसगी रूग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

**31.05.2025** **जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांची साने गुरूजी रूग्णालयास भेट.**

नांदेडचे जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांनी आज किनवट येथे साने गुरूजी रूग्णालयाला सदिच्छा भेट दिली तसेच महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या कार्याची माहिती घेतली. त्यांच्या समवेत डॉ. ओमप्रकाश साबळे हे उपस्थित होते. या प्रसंगी रूग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे यांनी डॉ. भोसीकरांचा शाल आणि प्रा. डॉ. सोमनाथ रोडे लिखित "**आनंदवन - सेवेचे रामायण**" हे पुस्तक देऊन स्वागत केले. या प्रसंगी रूग्णालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

विज्ञान, छंद व साहस उन्हाळी शिबीर

**(04 जुन ते 08 जुन 2025)**

**राष्ट्र सेवा दल शिबीर: देशभक्ती व सामाजिक मूल्यांची घडण घडवणारी पाठशाळा – सदाशिव मकदूम**

भारत जोडो युवा अकादमीचे साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी (MIDC) येथे आयोजित राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिराचे उद्घाटन दि. ४ जून रोजी उत्साहात पार पडले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेल्या राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते मा. सदाशिव मकदूम यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना सांगितले की, "हे शिबीर म्हणजेच एक देशभक्त घडवणारी पाठशाळा आहे. बालकांमध्ये राष्ट्रप्रेम, लोकशाही मूल्ये, सेवा भाव, सामाजिक समता व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी राष्ट्र सेवा दलाचे कार्य मोलाचे आहे." मकदूम यांनी राष्ट्र सेवा दलाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगताना म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात या संघटनेची स्थापना झाली. आजही ही संघटना तरुणांमध्ये शिस्त, नेतृत्व, सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि विवेकशील विचारांचा प्रसार करण्याचे कार्य करत आहे. अंधश्रद्धा, रूढी, कुप्रथा यांच्या विरोधात वैज्ञानिक विचारसरणीची जाणीव निर्माण करण्यासाठी राष्ट्र सेवा दल शिबिर उपयुक्त ठरते.

या शिबिराचे दुसरे उद्घाटक व प्रसिद्ध निवेदक मा. उत्तमराव कानिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "शिबिर हे आपल्या आवडी, छंद व प्रतिभा विकसित करण्याचे उत्तम माध्यम आहे. यातून वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाण आणि आत्मविश्वास वाढतो." याचा आपणाला भरपूर लाभ होणार आहे याचा मला पूर्ण विश्वास आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपला परिसर नैसर्गिक व सांस्कृतिक संपत्तीने समृद्ध आहे.  तसेच आपल्या सर्वांसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांच्यावर मात करुन पढे जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठीच या शिबीराची आखणी केली म्हणुन आपण सर्व या शिबिराचा लाभ घ्यावा. राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून आपण देशाच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे."

दिनांक 04 जुन ते 08 जुन या कालावधीत होणा-या या शिबिरात किनवट तालुक्यातील 125 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. उद्घाटनाच्या प्रारंभी साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उदघाटक मा. उत्तम कानिंदे यांचा सत्कार

मेहरसिंग चव्हाण यांनी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे लिखीत श्रमश्री बाबा आमटे यांच्या जिवन कार्यावरील पुस्तक देउन केले. मा. सदाशिव मकदूम यांचे स्वागत मा. डॉ. योगेंद्र वरटकर यांनी केली. सीमा सरपोतदार यांचे स्वागत डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. मा. कोमल मकदूम यांचे स्वागत मा. डॉ. भाग्यश्री बेलखोडे – वरटकर यांनी केले. प्रशिक्षक शौर्य यांचे स्वागत समाजकार्य प्रशिक्षणार्थी नेहा आडे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तेजस्विनी उईके यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. वसंत राठोड, राम राठोड इतर पालक उपस्थित होते तर हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रेमसिंग बसी, नितीन टापरे, मनोज चमनवार, संजय बोलेनवार, नागेश देवतळे, कल्पनाताई तोडसाम, बादल पवार, विपीन पवार, दशरथ काका यानी अथक परीश्रम घेतले.

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, मानवी साखळी, पर्यावरण जनजागृती –प्रेरणादायी उपक्रम**

५ जून २०२५ भारत जोडो युवा अकादमी व सामाजिक वनीकरण विभाग, किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, एमआयडीसी कोठारी परिसरात पर्यावरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वृक्षारोपण, पर्यावरणाविषयी जनजागृती, मानवी साखळी व प्रतिज्ञा घेऊन एक प्रेरणादायी उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी सुनील खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. त्यांनी उपस्थित राष्ट्र सेवा दलाचे विज्ञान, साहस व छंद शिबीरातील विद्यार्थ्यांना संबोधित करताना पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्व विषद केले. “प्राणवायूचा पुरवठा, जैवविविधतेचे संवर्धन, हवामान नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्याचा संबंध पर्यावरणाशी अतूट आहे,” असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मान्यवर जेष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे (सर्जन) यांनी भूषविले. त्यांनी आपल्या भाषणात किनवट तालुका हा निसर्गसंपन्न असूनही अन्नउत्पादनाच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल होत असल्याचे सांगितले. “आपण सर्वांनी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व पर्यावरण शिक्षणाचा प्रसार करणे गरजेचे आहे,” असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

कार्यक्रमानंतर परिसरात वड, पिंपळ, जांभूळ, करंजी, कडूलिंब, आपटा अशा स्थानिक उपयुक्त वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वृक्षी दिंडीही काढण्यात आली. सर्व सहभागी बालकांनी “मी माझ्या परिसरात वृक्ष लावीन, त्यांचे संगोपन करीन” असा संकल्प करत मानवी साखळीच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

कार्यक्रमात किनवट तालुक्यातील विविध गावांतील १२५ बालकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या उपक्रमात राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते मा. सदाशिव मकदूम, सीमा सरपोतदार, बालाजी भुरके, शहाजी डोईफोडे, अंकुश राठोड, राम भुसमवार, डॉ. शिवाजी गायकवाड, नीतीन टारपे, संजय बोलनवार, कल्पना तोडसाम, नागेश देवतळे, विपीन पवार तसेच समाजकार्य प्रशिक्षणार्थी नेहा आडे, प्राचार्य प्रेमचंद बसी, रामदास सलाम, राजनंदनी पडवळ, प्रियंका कुलकर्णी यांनी विशेष मेहनत घेतली.

**शिबीरार्थ्यांना जंगलभ्रमण, रुग्णालय व वृध्दाश्रमातून शाश्वत विकासाचे धडे**

६ जून २०२५ भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एमआयडीसी कोठारी येथे सुरू असलेल्या राष्ट्र सेवा दल, किनवट यांच्या विज्ञान, साहस व छंद शिबिरात तालुक्यातील विवीध गावातील १२५ शिबीरार्थ्यांनी गुरुवारी शाश्वत विकासाच्या विविध अंगांचा अभ्यासमूलक अनुभव घेतला.

शिबीरार्थ्यांनी सर्वप्रथम राजगड वन परीक्षेत्रातील वन विभाग कार्यालयाला भेट दिली. येथे प्रमुख वनपाल जी. एन. कापसे आणि एच. बी. चौधरी यांनी शिबीरार्थ्यांना जंगल व्यवस्थापन, वनस्पतींचे प्रकार, औषधी वनस्पती, वन्यप्राणी व दुर्मीळ जैवविविधतेची माहिती दिली. जंगलातील संभाव्य धोके, त्यावरील उपाययोजना आणि जंगल संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. यानंतर जंगलभ्रमंतीत शिबीरार्थ्यांना प्रीयदर्शिनी विमानतळ परिसरात मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर शिबीरार्थ्यांनी साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्राला भेट दिली. वैद्यकीय संचालक डॉ. योगेंद्र वरटकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर, डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासोबत संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध वैद्यकीय विभाग पाहिले, रुग्णांशी संवाद साधला व रुग्णालयात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती घेतली. सामाजिक कार्यकर्ते विकास बोलेणवार यांनी रुग्णांसाठी उपलब्ध योजना व सेवांचे सविस्तर मार्गदर्शन केले. या भेटीत विद्यार्थ्यांनी "आम्हीही डॉक्टर होऊन समाजसेवेसाठी काम करू" अशी प्रेरणा व्यक्त केली.

त्यानंतर शिबीरार्थ्यांनी किनवट येथील संस्थागार वृध्दाश्रमाला भेट दिली. वृध्दांशी संवाद साधताना त्यांच्या आयुष्यातील संघर्ष आणि सध्याच्या गरजा समजून घेतल्या. अनेक शिबीरार्थी भावूक झाले, काहींच्या डोळ्यांत अश्रूही तरळले. या अनुभवातून प्रेरणा घेत, "आमच्या आजी-आजोबांना, आई-वडिलांना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ देणार नाही" अशी शपथ शिबीरार्थ्यांनी घेतली.

या अभ्यासदौऱ्याचे यशस्वी आयोजन राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते मा. सदाशिव मकदूम, सीमा सरपोतदार, सामाजिक वनीकरण विभागाचे सुनील खामकर, प्रा. डॉ. सुनील व्यवहारे, शिक्षक राम भुसमवार, डॉ. शिवाजी गायकवाड, नीतीन टारपे, संजय बोलेणवार, कल्पना तोडसाम, नागेश देवतळे, विपीन पवार तसेच समाजकार्य प्रशिक्षणार्थी नेहा आडे, प्रेमचंद बसी, रामदास सलाम, राजनंदिनी पडवाळ व प्रियांका कुलकर्णी यांनी घेतलेले परिश्रम उल्लेखनीय ठरले.

**डिजिटल इंडिया अभियानामुळे देशाच्या विकासाला नवी गती – श्रीकांत रोडे**

07 जून 2025 भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी (MIDC), येथे आयोजित राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिरात "डिजिटल इंडिया आणि तंत्रज्ञानाचे सामाजिक परिणाम" या विषयावर मार्गदर्शन करताना नासकॉम फाउंडेशनचे श्रीकांत रोडे यांनी डिजिटल इंडिया अभियानामुळे भारताच्या विकासाच्या प्रक्रियेला नवे वळण लाभले असल्याचे सांगितले.

शिबिरात 22 गावांतील 125 बालकांनी सहभाग घेतला. श्रीकांत रोडे यांनी डिजिटल साक्षरतेच्या संदर्भात उपस्थित बालकांशी संवाद साधताना सांगितले की, संगणक व मोबाईल तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार झाल्यामुळे माहितीची सहज उपलब्धता, वेळ व श्रमांची बचत आणि शैक्षणिक संधी वाढल्या आहेत. योग्य पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर केल्यास तो समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

यावेळी त्यांनी मोबाईलचा संतुलित वापर करण्याचे महत्त्व पटवून दिले. अतिवापरामुळे निद्रानाश, दृष्टिदोष, शारीरिक समस्या, मैदानी खेळांची कमतरता, चिडचिडेपणा, एकलकोंडेपणा यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत, हे उदाहरणासहित सांगितले. मोबाईलचा केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर शिक्षण, माहिती व कौशल्यविकासासाठी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून सीमा सरपोतदार, मा. सदाशिव मकदूम होते. सत्र यशस्वी करण्यासाठी डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. भाग्यश्री बोलखोडे–वरटकर, प्रेमसिंग बसी, नितीन टापरे, मनोज चमनवार, संजय बोलेनवार, नागेश देवतळे, कल्पनाताई तोडसाम यांनी मोलाचे योगदान दिले.

या उपक्रमाच्या माध्यमातून तंत्रज्ञान साक्षरतेचा संदेश ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश सफल झाला आहे.

**राष्ट्र सेवा दल शिबिरात आरोग्याच्या प्रथमोपचाराचे धडे**

07 जून 2025 भारत जोडो युवा अकादमीतर्फे साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी (MIDC) येथे आयोजित राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिरात आयोजित केलेल्या प्रथमोपचार कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत किनवट तालुक्यातील 22 गावांमधून आलेल्या विविध आदिवासी, भटके-विमुक्त आणि इतर घटकातील सुमारे 125 बालकांनी सहभाग नोंदवला. ज्येष्ठ वैद्यकीय सर्जन डॉ. अशोक बेलखोडे यांनी कृत्रिम शरीररचनेच्या सांगाड्याच्या साहाय्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून शिबिरार्थ्यांना अपघातात किंवा आपत्कालीन परिस्थितीत कसे प्राथमिक उपचार करावेत याचे प्रशिक्षण दिले. हृदयविकाराच्या झटक्यापासून सुरक्षेसाठी दिला जाणारा CPR, हात-पाय फ्रॅक्चर झाल्यास बांधणी, सर्पदंश झाल्यावर तात्काळ उपाययोजना, आणि श्वासोश्वास बंद पडल्यावर त्वरित मदत अशा महत्त्वाच्या बाबी शिबिरार्थ्यांना शिकवण्यात आल्या. या सत्रात अनेक शिबिरार्थ्यांनी डॉ. बेलखोडे यांना आपल्या शंका विचारल्या, ज्यांना त्यांनी सोप्या आणि अनुभवाधारित उत्तरांनी समाधानकारक खुलासे दिले. एका एकी घेरी आल्यास, बेशुध्द आवस्थेत, संर्प  दंश, विंचू दंश झाल्यास, हाड मोडल्यास, रक्त स्राव झाल्यास, पाण्यात बुडणे, जळणे, भाजणे, झटके आल्यास या व अशा आपात कालीन परीस्थितीत प्रथमोउपचारक म्हणुन काय करावे याचे प्रात्याक्षिक करुन दाखवून व विद्यार्थ्यांकडून करवून घेउन मार्गदर्शन केले. सोबतच या वयात मदत कार्य करण्यासाठी आपल्या अंगी कौशल्य, चिकाट, धैर्य, प्रामाणिकपणा, मायाळू वृत्ती, ज्ञान व कौशल्ये तसेच मदत करण्याची ईच्छा व वृत्ती असे अनेक इत्यादी गुण प्रथमोउचारकाच्या अंगी असायला हवेत. व ते या वयात आपण अवगत केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. बेलखोडे यांनी प्रतिपादन करती विद्यार्थ्यांना सोदाहरण धडे देउन प्रवृत्त केले.

सोबतच रुग्णांना अशा परीस्थीत दवाखान्यात कसे न्यावे, इतरांची मदत कशी घ्यावी.  डॉक्टरांनाही मदत कशी करावी हे सोदाहरणे समजून सांगितले. या शिबीरात प्रथमो उपचाराचे व कृत्रीम श्वासोश्वास घेण्याचे, रक्तस्राव इत्यादी ज्ञान आमच्या आयुष्यात सेवा कार्य करण्यास मालाची मदत करेल, आम्हाला हे ज्ञान शिबीच्या निमीत्ताने मिळाले हे आमचे भाग्य असे शिबीरार्थी मुला मुलींनी अशी भावना व्यक्त करुन डॉक्टरांचे आभार मानले.

ही कार्यशाळा शिबिरार्थ्यांसाठी आजीवन उपयोगी ठरणारा अनुभव ठरली, असा सकारात्मक प्रतिसाद सहभागी विद्यार्थ्यांकडून मिळाला.

कार्यशाळेत राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव मकदुम व सीमा सरपोतदार यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यशाळेचे समन्वय डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी नीतीन टापरे, तुषार डंबाळे, कल्पना तोडसाम, प्रमुख प्रेमचंद बशी, रामदास सलाम, प्रियंका कुलकर्णी, राजनंदनी पडवाळ, अजिंक्य कायापाक, बादल पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

**राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिराला राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे भेट**

07 जून 2025 भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने साने गुरुजी ईमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी (MIDC) येथे आयोजित राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिरास राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अजित शिंदे यांनी सदिच्छा भेट देत शिबिराचा सविस्तर आढावा घेतला.

या शिबिरात किनवट तालुक्यातील २२ गावांमधून आलेल्या सुमारे १२५ आदिवासी, भटके-विमुक्त व इतर घटकांतील बालकांसोबत त्यांनी थेट संवाद साधला. बालकांनी शिबिरात सहभागी होण्यामागील उद्देश, त्यांचे अनुभव, शिबिरातील दैनंदिन कार्यक्रम, बौध्दिक सत्रे, मार्गदर्शक यांच्याविषयी विचारपूस केली. त्यांनी शिबिरातील खाद्य व निवास व्यवस्थेची देखील माहिती घेतली आणि व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.

शिबिराच्या उपयुक्ततेवर भर देत शिंदे यांनी बालकांना शिबिरातील प्रत्येक उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. राष्ट्र सेवा दलाची पंचसूत्री – लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा आणि शिस्त अंगीकारण्याचा सल्ला त्यांनी दिला.

तसेच शिबीर समारोपीय दिवशी पूर्ण वेळ राष्ट्र सेवा दल नांदेड जिल्हा अध्यक्ष श्री. गणेश पाटील यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना खेळ, गाणी शिकवित त्यांच्याशी संवाद साधला. समारोप प्रसंगी त्यांच्या हस्ते जेष्ठ प्रशिक्षक मा. सदाशिव मकदूम आयोजक व शिबीरार्थी यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला. दर वर्षीच्या शिबीराप्रमाणे याही वर्षी त्यांची उपस्थिती शिबीरार्थी यांना प्रेरक ठरली.

शिबीरातील मुख्य प्रशिक्षक राष्ट्र सेवा दलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते मा. सदाशिव मुकदम, सिमा सरपोतदार, शौर्य भोसले व ज्ञानेश्वर यांच्या कार्याचे मनभरून कौतूक केले आणि त्यांनी देत असलेल्या योगदानाबददल आभार मानले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांनी अध्यक्ष अजित शिंदे यांचा शिबिरार्थ्यांच्या वतीने सत्कार करून त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले.

या भेटीतून शिबिरातील कार्यपद्धतीला चालना मिळाली असून, बालकांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

## राष्ट्र सेवा दल शिबीर: समारोप

**जुन 08 2025** *राष्ट्र सेवा दल* आणि *भारत जोडो युवा अकादमी* यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित *विज्ञान, सहास व छंद शिबीर*चा समारोप ८ जून २०२५ रोजी साने गुरुजी रुग्णालय, कोठारी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

शिबीराची सुरुवात राष्ट्र सेवा दलाचे जेष्ठ कार्यकर्ते आणि प्रशिक्षक श्री. सदाशिवराव मकदूम यांच्या प्रेरणादायी प्रार्थनेने झाली. शिबीरार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले, ज्यात ऑरोबिक्स, लेझीम, कवायती आणि झांज प्रात्यक्षिकांचा समावेश होता. या प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रचंड प्रतिसाद दिला.

**“राष्ट्र सेवा दलाचे शिबीर हे राष्ट्रनिर्माणाच्या कार्याची प्रयोगशाळा आहे. येथे तयार होणारे कार्यकर्ते समाजातील परिवर्तनाचे नेतृत्त्व करतात,”** असे विचार समारोप समारंभाचे प्रमुख वक्ते श्री. सदाशिवराव मकदूम सर यांनी व्यक्त केले.

### शिबीराचे उद्दिष्ट आणि महत्व

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक दायित्व आणि राष्ट्रप्रेमाचे धडे दिले गेले. ४ जून ते ८ जून दरम्यान शिबीरात २२ गावांतील १२५ भटके, आदिवासी आणि इतर समाजाच्या मुलांनी सहभाग घेतला. यामध्ये शिबीरार्थ्यांना विविध कौशल शिकवले गेले, तसेच त्यांना सामाजिक समतेची आणि लोकशाही मूल्यांची साक्षात्कार झाला.

माजी नगराध्यक्ष इसाखान साहेब, के. मुर्ती, आणि डॉ. अशोक बेलखोडे यांनी शिबिराच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे योगगुरू अखिल खान यांनीही शिबिराच्या कार्याचे कौतुक करत शिबिरासारख्या उपक्रमांची आपल्या तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आवश्यकता असल्याचे सांगितले.

**शिबीरार्थ्यांचे अनुभव**

शिबीरार्थी **विशाखा होळंबे** हिने शिबिरातील आपल्या अनुभवांची चर्चा करत, शिबिरात शिकलेले जीवनदृष्टी, शिस्त आणि थोरांचे विचार उपस्थितांसमोर मांडले. तिच्या पालकांनी शिबिरातून झालेल्या सकारात्मक परिवर्तनाची कदर केली आणि आयोजकांचे आभार मानले.

**मान्यवरांचा गौरव**

समारोप समारंभात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेस्वीनी उईके यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करत, **मुरलीधर बेलखोडे** यांनी शिबीरात शिकलेल्या शिकवणींना आयुष्यात लागू करण्याचे आवाहन केले. तसेच, शिबीरात सहभागी सर्व शिबीरार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. अशोक बेलखोडे, सिमी सरपोतदार, नरेंद्र वडगावकर, गणेश पाटील, नसीर तगाले आणि इतर शिबीराचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

**दात्यांचे आणि भारत जोडो युवा अकादमीच्या सदस्यांचे योगदान**

शिबीराच्या यशस्वीतेसाठी अनेक दात्यांनी मदत दिली. तसेच, *भारत जोडो युवा अकादमी* परिवारातील सदस्यांनी अथक परीश्रम घेतले. त्यांच्या मदतीने शिबीराच्या आयोजनात सर्व काही सुरळीत आणि प्रभावीपणे पार पडले.

राष्ट्र सेवा दलाच्या या शिबिराने सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. उपस्थितांनी व्यक्त केले की, अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत परिवर्तन होईल आणि ते समाजासाठी अधिक उपयोगी ठरतील. पुढील काळातही या प्रकारच्या उपक्रमांची आवश्यकता आहे, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

**06.06.2025** **आनंदी विकास यांची रूग्णालयास सदिच्छा भेट**

**07.06.2025** **डॉ. सिध्देश्वर हुकीरे, लातूर यांचा रूग्णालयास सदिच्छा भेट**

**09.06.2025** **डॉ. शुभम पवार यांचा रूग्णालयास सदिच्छा भेट**

सुमतीबाई हेमसिंग नाईक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक दुर्गादास पवार मुळ गाव सिंगोडा यांचे चिरंजिव डॉ. शुभम पवार, (MBBS, MS) जनरल सर्जरी यांची साने गुरूजी रूग्णालय येथे सदिच्छा भेट. नुकतेच त्यांची उपजिल्हा रूग्णालय गोकुंदा येथे नेमणूक झाली आहे.

एम.बी.बी.एस.ला पात्र ठरल्यानंतर त्यांचा भारत जोडो युवा अकादमी व डॉक्टर्स असोसिएशन किनवट तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये पालकांसह सत्कार करण्यात आला होता. आणि विशेष म्हणजे त्यांचा जन्म आपल्या साने गुरूजी रूग्णालयातच झाला.

**23.06.2025** **आंतरराष्ट्रीय विधवा सन्मान दिन साजरा**

23 जुन हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणुन पाळला जातो. 2011 पासून संयुक्त राष्ट्र संघाने या महिलांच्या वेदनेकडे लक्ष वेधण्यासाठी हा दिवस सुरू केला. भारतात विधवा महिलांची संख्या खूप जास्त आहे. आपण नाही सर्वांच्या मदतीला पोहोचू शकलो तरी, आपल्या सोबत काम करणाऱ्या अशा महिलांना त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि आपल्या छोट्याश्या मदतीने त्यांच्या जीवनातील भार हलके व्हावे या उद्देशाने आज भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय किनवटचे संचालक येथे डॉ. अशोक बेलखोडे यांनी पुष्पलता लैचट्टीवार आणि लक्ष्मी आरपेल्लीवार या विधवा महिलांचा सन्मान करून प्रत्येकी पाच हजार रूपयांचा विधवा सन्मान निधी म्हणून मदत केली. डॉ. भाग्यश्री वरटकर - बेलखोडे आणि डॉ. योगेंद्र वरटकर यांच्याहस्ते धनादेश वितरीत करण्यात आले. यावेळी डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या समवेत साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या विषयाप्रति अत्यंत आत्मियतेने चळवळ म्हणुन काम करणारे आमचे मित्र श्री. हेरंब कुलकर्णी यांच्या साऊ एकल महिला समितीचा उपक्रमव त्यांनी फेसबुकवरून केलेल्या आजच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून हे पाऊल आहे. भारत जोडो युवा अकादमी मागच्या काही वर्षापासून दरवर्षी जवळपास 25 एकल पालक असलेल्या मुलींच्या शिक्षणासाठी प्रत्येकी 5 हजार रूपये शिष्यवृत्ती म्हणुन सहाय्य करीत असते.

**23.06.2025** **एकम फाऊंडेशन, मुंबई यांची आर्थिक मदत वितरीत**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे एकम फाऊंडेशन मुंबईच्या अर्थसहाय्याने 0 ते 18 वयोगटातील मुला-मुलींना सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेत 50% सुट दिली जाते. दिनांक 23 जुन 2025 रोजी

1. ऋषिकेश जाधव - दहेली तांडा, ता. किनवट जि. नांदेड
2. कृष्णा डोईफोडे - शनिवारपेठ ता. किनवट जि. नांदेड

यांना फिरता दवाखाना सांभाळणारे डॉ. प्रगती पवार यांच्या हस्ते धनादेश वितरीत करण्यात आले.

**२५ जून २०२५**

**साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे अरण्यऋषी मारोती चितमपल्ली यांना श्रद्धांजली**

भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र येथे अरण्यऋषी मारोती चितमपल्ली यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. साने गुरूजी रूग्णालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमात मारोती चितमपल्ली यांचे कार्य आणि त्यांचे पर्यावरण व वन्यजीवन संरक्षणासाठी केलेले योगदान या विषयी चर्चा करण्यात आली.

अरण्यऋषी मारोती चितमपल्ली हे वन्यजीवन प्रेमी होते, ज्यांनी वन आणि जंगलांचं रक्षण करण्यासाठी जीवन समर्पित केलं. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना जंगलांचे महत्त्व आणि त्यांचे संरक्षण करण्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमात डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. रामप्रसाद तौर सर, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, वनविभागाचे कर्मचारी श्री. सुनिल खामकर प्रमुख वक्त्यांनी मारोती चितमपल्ली यांच्या कार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या जीवनाच्या या अद्वितीय योगदानाचे कौतुक केले. यावेळी बालरोगतज्ञ डॉ. शिंदे, डॉ. योगेंद्र वरटकर, स्त्रिरोगतज्ञ डॉ. भाग्यश्री वरटकर - बेलखोडे,

प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा. दगडू भरकड, बबन वानखेडे, डॉ. मानसी व्यवहारे, यांच्यासह उपस्थित सर्वांनी त्यांना आदरांजली अर्पित केली. तत्पुर्वी नविन बांधकाम सुरू असलेल्या साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल MIDC कोठारी येथे त्यांच्या नावाने एक स्मृतिवृक्ष लावण्यात आले.

26.06.2025

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी**

किनवट – दिनांक 26 जुन 2025 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि बहुजन समाजासाठी कार्य करणारे **राजर्षी छत्रपती शाहू महाराज** यांची जयंती आदरपूर्वक साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या वेळी रुग्णालय प्रशासनातर्फे शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांची सामाजिक समतेसाठीची लढाई, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत हक्कांसाठी त्यांनी उभारलेले कार्य उपस्थितांपुढे मांडले गेले.

या वेळी डॉ. अशोक बेलखोडे यांनी सांगितले, "शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकांसाठी जे कार्य केले, त्यातून आपण आजही प्रेरणा घेऊ शकतो. आरोग्य आणि शिक्षण हेच समाज प्रगतीचे बळ आहे."

**27.06.2025**

**डॉ. दिपेशकुमार शर्मा यांची साने गुरूजी रूग्णालयाला भेट**

आज दिनांक 27 जुन 2025 रोजी महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. दिपेशकुमार शर्मा यांनी साने गुरूजी रूग्णालयास भेट दिली. व योजनेच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विविध कार्याचा आढावा घेतला. या भेटी दरम्यान डॉ. अशोक बेलखोडे यांनी या परिसरातील लोकांना सदरील योजनेचा लाभ मिळण्या करीता एनआयसीयू, युरोलॉजी, आर्थोपेडिक, न्युरोलॉजी, हे विभाग योजनेत सामाविष्ट करावे अशी मागणी केली. यावर डॉ. शर्मा यांनी यावर मी ताबडतोब निर्णय घेऊन कार्यवाहीसाठी पाठविणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या सोबत गोकुंदा येथील आरोग्यमित्र शेख युसुफ आणि सुशिल गोखले हे उपस्थित होते.

01 जुलै 2025

**डॉक्टर्स डे निमित्त डॉ. अशोक बेलखोडे यांचा सत्कार**

डॉक्टर्स डे **निमित्त साने गुरूजी रूग्णालय व संशोधन** केंद्रात **आयोजित छोटेखानी कार्यक्रमात** डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. भाग्यश्री वरटकर- बेलखोडे, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. प्रगती पवार, डॉ. विजय काळे, डॉ. सचिन टेळके **यांचा** सत्कार **करण्यात आला.**

या कार्यक्रमात, रूग्णालयातील कर्मचारी व रूग्णांचे नातेवाईक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बेलखोडे यांच्या ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्यसेवेसाठी केलेल्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांचे सामाजिक योगदान अधोरेखित केले.

18.07.2025

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अण्णाभाऊ साठे स्मृतिदिनानिमित्त अभिवादन**

दिनांक 18 जुलै 2025 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रुग्णालयातील, कर्मचारी आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी आदरांजली वाहिली. अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर आणि साहित्य कार्यावर प्रकाश टाकणारे विचार वाचन आणि भाषणे करण्यात आली.

कार्यक्रमात विकास बोलेनवार यांनी आपले विचार मांडतांना सांगितले की, "अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीद्वारे श्रमिक, वंचित आणि उपेक्षित घटकांचा आवाज बनून काम केले. त्यांच्या विचारांमधून सामाजिक समतेचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे."

**31 जुलै 2025** **किनवट येथे वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम**

प्रा. किशनराव किनवटकर यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त किनवट शहरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्व. किशनराव किनवटकर, भारत जोडो युवा अकादमी व सांस्कृतिक संवर्धन मंडळ आयोजित या उपक्रमात पर्यावरणपूरक झाडे लावून त्यांना अभिवादन करण्यात आले.

वृक्षारोपणाचा कार्यक्रम साने गुरुजी इमर्जन्सी हॉस्पिटल, एम.आय.डी.सी. परिसर कोठारी येथे तसेच मानव कल्याण ट्रस्ट संचलित मनसब योग साधना केंद्र परिसरात पार पडला. या प्रसंगी शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते. साने गुरुजी रुग्णालयाचे संस्थापक डॉ. अशोक बेलखोडे, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, निवृत्त प्रा. रामप्रसाद तौर, योगगुरू अखिल खान, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष किरण किनवटकर, केतन किनवटकर, घुले, विनायक पाटील, मनोज चनमनवार, ठमके, कोडें काकू, संजय बोलेनवार, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

स्व. प्रा. किशनराव किनवटकर सर हे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व होते. त्यांच्या विविध सामाजिक, राजकीय आंदोलनाची, विकासात्मक योगदानाची आठवण जागवण्यासाठी, तसेच पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी हा वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात आला असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. बेलखोडे यांनी यावेळी व्यक्त केली.

01.08.2025

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त अभिवादन**

दिनांक 01 ऑगस्ट 2025 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे महान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात दोन्ही महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. रुग्णालयाचे अधिकारी, कर्मचारी, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलतांना डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले, "लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्यलढ्याचे शिल्पकार होते, तर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याने समाजातील शोषितांना आवाज दिला. दोघांच्याही विचारांमधून आजच्या काळात प्रेरणा घेणे गरजेचे आहे.

**09.08.2025** **भारत जोडो युवा अकादमीचे हितचिंतक रेखी दांपत्याची साने गुरुजी रुग्णालयास भेट**

भारत जोडो युवा अकादमीच्या सामाजिक उपक्रमात सातत्याने मोलाचा आर्थिक वाटा उचलणारे नवी मुंबई येथील दानशूर दांपत्य **सौ. पल्लवी आणि श्री. प्रसाद रेखी** यांनी नुकतीच किनवट येथील **साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलला** सदिच्छा भेट दिली.

भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरुजी रुग्णालयाच्या उभारणीत रेखी दांपत्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयाच्या पहिल्या टप्प्यातील कामाची आणि नुकत्याच कार्यान्वित झालेल्या अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रणांची पाहणी केली.

"आपणांस दिलेल्या आर्थिक मदतीचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकाच्या आरोग्यासाठी होताना पाहून मनाला मोठे समाधान मिळते," अशा भावना श्री. प्रसाद रेखी यांनी यावेळी व्यक्त केल्या. भविष्यातही या सेवायज्ञात आपला सहभाग कायम राहील, असे आश्वासन रेखी दांपत्याने दिले. याप्रसंगी रुग्णालय प्रशासनातर्फे रेखी दांपत्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.

09.08.2025

## साने गुरूजी रूग्णालयात जागतिक आदिवासी दिन साजरा

दिनांक 09 ऑगस्ट 2025 **रोजी** जागतिक आदिवासी दिन **(World Tribal Day)** निमित्ताने भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालयात आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच संस्थेचे अध्यक्ष **डॉ. अशोक बेलखोडे** यांनी सोशल मिडियावरून व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त केले व सर्व आदिवासी समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

आपल्या संदेशात डॉ. बेलखोडे यांनी आदिवासी समाजाचे इतिहासातील योगदान, त्यांच्या संस्कृतीचे महत्व आणि त्यांच्या हक्कांसाठी एकजूट होण्याचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, *"आदिवासी समाज हा भारताच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यांच्या विकासासाठी प्रत्येकाने योगदान देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे."*

10.08.2025

## साने गुरूजी रूग्णालयातील २५ वर्षांच्या सेवेचा गौरव!

भारत जोडो युवा अकादमी संस्थेने साने गुरूजी रूग्णालयातील दीर्घ अनुभवी कर्मचारी सौ. वंदनाताई ज्ञानेश्वर उईके यांचा २५ वर्षांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल विशेष सत्कार केला.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. शिरीष पत्की, डॉ. वंदना पत्की, प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा. डॉ. राहूल रामप्रसाद तौर, डॉ. मानसी व्यवहारे यांच्यासह रूग्णालयातील सर्व सदस्य उपस्थित होते.

साने गुरूजी रूग्णालयात विविध वैद्यकीय सेवा आणि सामाजिक कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावत असलेल्या वंदनाताई उईके यांच्या सेवेचा २५ वर्षांचा अनुभव केवळ रूग्णालयासाठीच नव्हे, तर संपूर्ण संस्थेसाठी एक प्रेरणा ठरला आहे.

प्रशंसा आणि अभिनंदनाच्या वातावरणात, वंदनाताईंनी यावर प्रतिक्रिया दिली. **"**मी केवळ माझ्या कर्तव्याचे पालन केले आहे, परंतु या सत्कारामुळे मला आणखी प्रेरणा मिळाली आहे. हे सर्व रूग्णालयातील माझ्या सहकाऱ्यांचे योगदानामुळेच शक्य झाले आहे**,"** अशा शब्दांत त्यांनी त्यांचा अनुभव व्यक्त केला.

**प्रा.डॉ. सुरेंद्र शिंदे यांचा सत्कार**

याच कार्यक्रमात प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्राच्या सह-समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचेही या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.

**डॉ. योगेंद्र वरटकर यांचे अनुभव कथन**

डॉ. योगेंद्र वरटकर हे 10 दिवसीय हिमालयीन डोंगर चढाई आणि जंगलभ्रमंती साठी उत्तराखंड येथे फिरुन परत आले होत त्यांनी त्यांना आलेले अनुभव आणि साहसीक क्षणाचा वृतांत उपस्थितांपुढे मांडला सोबतच विविध निसर्गरम्य ठिकाणी काढलेले फोटो आणि व्हिडिओची माहिती देत उपस्थितांना दाखविण्यात आले. सदरील फोटो व अनुभव सांगतांना उपस्थितांमध्ये एक वेगळाच रोमांच भरला होता.

**15.08.2025**

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे 77 वा स्वातंत्र्यदिन साजरा**

दिनांक **15 ऑगस्ट 2025** रोजी भारताचा **७६ वा स्वातंत्र्यदिन** साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी **८.४५ वाजता** रुग्णालयाच्या इमारतीवर प्रा. रामप्रसाद तौर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे**,** डॉ. भाग्यश्री बेलखोडे- वरटकर**, डॉ. योगेंद्र वरटकर, यांच्यासह** साने गुरूजी रुग्णालय परिवारातील सदस्य**,** सर्व कर्मचारीवृंद**,** रुग्ण व त्यांचे नातेवाईक**,** शालेय विद्यार्थी**, तसेच** गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले व देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यानंतर उपस्थितांना अल्पोपहार व चहा वितरित करण्यात आला. उपस्थितांनी देशप्रेम व एकतेचा संदेश देणारे विचार मांडले.

**18.08.2025**

**निसर्ग सेवा समिती, वर्धा यांची भेट**

दिनांक 18ऑगस्ट 2025 रोजी वर्धा येथील निसर्ग सेवा समितीच्या 50 सदस्यांनी भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालय व MIDC येथे निर्माणाधिन असलेली साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल येथे भेट दिली. या प्रसंगी ग्रामगीताचार्य तुकाराम दादा अड्याळ, यांच्यासह रवी मानव, प्रमोद भोयर, बाळकृष्णजी हांडे, सौ. भोयर, वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, प्रा. डॉ. शोभा बेलखोडे हे होते.

या कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत करीत डॉ. अशोक बेलखोडे यांनी संस्थेची व उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी डॉ. मानसी व्यवहारे - शिंदे यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

**28.08.2025** **लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहीत्यावर डॉ.अनंत राऊत यांचे व्याख्यान**

दिनांक 18ऑगस्ट 2025 रोजी वर्धा येथील निसर्ग सेवा समितीच्या 50 सदस्यांनी भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालय व MIDC येथे निर्माणाधिन असलेली साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल येथे भेट दिली. या प्रसंगी ग्रामगीताचार्य तुकाराम दादा अड्याळ, यांच्यासह रवी मानव, प्रमोद भोयर, बाळकृष्णजी हांडे, सौ. भोयर, वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, प्रा. डॉ. शोभा बेलखोडे हे होते.

या कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत करीत डॉ. अशोक बेलखोडे यांनी संस्थेची व उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी डॉ. मानसी व्यवहारे - शिंदे यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

25.08.2025 **भारत जोडो युवा अकादमी च्या मदतीने २०० पूरग्रस्तांना राशन किटचे वाटप**

कमल उदवाडीया फाऊंडेशन, मुंबई यांच्या आर्थिक सहकार्याने व भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्राच्या मदतीने तातडीची मदत म्हणुन शहरातील २०० पूरग्रस्तांना राशन किटचे वाटप साने गुरुजी रुग्णालयाच्या आवारात नुकतेच करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान हे होते. यावेळी मंचावर माजी उपनगराध्यक्ष गंगारेड्डी बैनमवार, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, प्रा.रामप्रसाद तौर, अॅड.दिलिप काळे, अॅड. अभिजित वैद्य, डॉ.योगेंद्र वरटकर,प्रा.डॉ.सुरेंद्र शिंदे व अॅड.मिलिंद सर्पे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी साने गुरुजी रुग्णालयाचे प्रमुख डॉ.अशोक बेलखोडे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.भाग्यश्री बेलखोडे, प्रा.डॉ.शिवाजी गायकवाड, डॉ. प्रगती पवार, मिलिंद कांबळे, प्रणाली निकोडे, संजय बोलेनवार, नागेश देवतळे, शेख राझिक यांनी पुढाकार घेतला.

## पूरग्रस्त मदत मोहिम: संक्षिप्त अहवाल (ऑगस्ट - सप्टेंबर २०२५)

**भारत जोडो युवा अकादमी (BJYA)** संस्थेच्या वतीने २२ ऑगस्ट २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पूरग्रस्तांसाठी विशेष मदत मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेला विविध दातृत्त्ववान संस्थांनी दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे आम्ही प्रभावीपणे मदत कार्य करू शकलो.

**मुख्य कामगिरी:**

| **अ.क्र.** | **उपक्रमाचा तपशील** | **लाभार्थी / संख्या** |
|---|---|---|
| १ | **अन्नधान्य किट वाटप** (किराणा माल) | १,१०० कुटुंबे |
| २ | **रुग्ण तपासणी** (रुग्णालयामार्फत) | २,०८१ रुग्ण |
| ३ | **शाळांना मदत** | ५ शाळा |

**आर्थिक सहकार्य करणाऱ्या संस्था:**

या मोहिमेसाठी एकूण **१७,५३,००० रुपये** निधी जमा झाला असून, खालील संस्थांनी मोलाचे योगदान दिले आहे:

- **कमल उडवाडिया फाउंडेशन:** १०,००,००० रु.
- **पारख फूड अँड ऑईल्स प्रा. लि.:** ५,००,००० रु.

- **रोटरी क्लब ऑफ बॉम्बे बेव्ह्यू चॅरिटेबल ट्रस्ट:** २,२०,००० रु.
- **इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे बेव्ह्यू:** ३३,००० रु.

संकट काळात योग्य वेळी मदत केल्याबद्दल भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष आणि पूरग्रस्त कुटुंबांच्या वतीने डॉ. अशोक बेलखोडे यांनी सर्व देणगीदारांचे मनापासून आभार मानले.

**07.09.2025**

**भारत जोडो युवा अकादमी ची वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन**

भारत जोडो युवा अकादमी ची वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दिनांक 07.09.2025 रोजी सकाळी 11.30 वाजता संस्थेचे अध्यक्ष **डॉ. अशोक बेलखोडे** यांच्या अध्यक्षतेखाली "साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, MIDC कोठारी, ता. किनवट येथे घेण्यात आली. या बैठकीत खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

1. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून मान्यता देणे.
2. आर्थिक वर्ष 2024-25 च्या अंकेक्षण अहवालास मान्यता देणे.
3. आर्थिक वर्ष 2024-25 च्या वार्षिक अहवालास मान्यता देणे
4. सन 2025-26 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
5. संस्थेच्या प्राथमिक शाळा, महाविद्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेणे व त्यास मान्यता देणे.
6. संस्थेच्या वतीने बांधण्यात आलेल्या साने गुरुजी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल बांधकामाचा आढावा घेणे .
7. साने गुरुजी इमर्जेन्सी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल चे उद्घाटन करण्याची संभाव्य तारीख ठरवून पूर्व तयारी करणे.
8. हॉस्पिटलसाठी लागणाऱ्या नवीन स्टाफ अधिकारी कर्मचारी व अन्य बाबी च्या पूर्तते बाबत चर्चा करून निर्णय घेणे.
9. आर्थिक वर्ष 2024-25 च्या देणग्यांचा आढावा घेऊन देणगीदारांचे आभार व्यक्त करणे
10. साने गुरुजी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलची धर्मादाय हॉस्पिटल यादीत येण्यासाठीचा प्रस्ताव सादर करणे बाबत.
11. संस्थेत नविन सभासद करून घेण्याच्या प्रक्रिये बाबत चर्चा करून नवीन सभासदास मान्यता देणे.
12. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेवरील विषयांवर चर्चा करणे.

**13.09.2025**

**डॉ. अशोक बेलखोडे यांचा ६६ वा वाढदिवस उत्साहात साजरा**

साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व आणि भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष तथा साने गुरुजी रुग्णालय परिवाराचे आधारस्तंभ **डॉ. अशोक बेलखोडे** यांचा ६६ वा वाढदिवस अत्यंत उत्साहात आणि स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

रुग्णालय परिवारातील डॉक्टर्स, परिचारिका आणि कर्मचारी वृंदाने डॉ. बेलखोडे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "डॉक्टरांचे ६६ वर्षांचे जीवन हे केवळ वय नसून, त्यांनी आरोग्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा आणि समाजसेवेचा एक समृद्ध प्रवास आहे".

**17.09.2025**

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा**

**17 सप्टेंबर 2025** रोजी साने गुरूजी रुग्णालयात **मराठवाडा मुक्ती संग्राम दिन** अभिमानपूर्वक साजरा करण्यात आला. या निमित्ताने रुग्णालयाच्या इमारतीवर **तिरंगा ध्वज** फडकविण्यात आला आणि स्वातंत्र्यलढ्याच्या वीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी **संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे** यांनी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी लढणाऱ्या **स्वातंत्र्यसेनानींच्या बलिदानाची आठवण** करून दिली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, *"१७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा हैदराबाद निजामाच्या सत्तेतून मुक्त झाला. हा दिवस केवळ विजयाचा नाही, तर त्याग, धैर्य आणि स्वाभिमानाचा आहे."*

कार्यक्रमात रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. या उपक्रमातून देशप्रेम, इतिहासाची जाण आणि कृतज्ञतेचा भाव जागवण्यात आला.

**17.09.2025** **प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांना साने गुरुजी रुग्णालय परिवारातर्फे स्नेहपूर्ण निरोप**

साने गुरुजी रुग्णालय परिवाराचे सक्रिय सदस्य **प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड** यांची 'कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट' येथून **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** येथे बदली झाली आहे. या निमित्ताने साने गुरुजी रुग्णालय परिवाराच्या वतीने त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

डॉ. गायकवाड यांनी किनवट परिसरातील आदिवासी विकास आणि संशोधन कार्यात दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. रुग्णालय परिवाराने त्यांच्या कार्याचा गौरव करत, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. सुभाष काळे, डॉ. विजय काळे, डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, मुख्याध्यापक प्रेमचंद बस्सी, प्रा. डॉ. प्रविण खंडागळे यांच्यासह साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

निरोप समारंभावेळी डॉ. गायकवाड यांनी रुग्णालय परिवारासोबतच्या आठवणींना उजाळा दिला आणि मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**20.09.2025** **श्री. हमराज उईके यांची साने गुरुजी रुग्णालयाला सदिच्छा भेट**

महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचे स्वीय सहाय्यक **श्री. हमराज उईके** यांनी दिनांक 20.09.2025 रोजी साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्राला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयातील अद्ययावत वैद्यकीय सोयी-सुविधांची पाहणी केली आणि रुग्णालय प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

श्री. उईके यांनी रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासह रूग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन ग्रामीण भागातील रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती घेतली. दुर्गम भागातील गोरगरीब व आदिवासी बांधवांसाठी साने गुरुजी रुग्णालय करत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

**28.09.2025** **साने गुरुजी रुग्णालयात पावसाळयाच्या सुरांनी रंगली 'कराओके स्पर्धा'**

आरोग्य सेवेसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र, किनवट यांच्या वतीने यावर्षी एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी रुग्णालयाच्या सभागृहात "तालुका स्तरीय कराओके स्पर्धा - पावसाळ्याची गाणी" अत्यंत उत्साहात पार पडली.

रुग्णालयाने विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले होते. तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून पावसाळ्यावर आधारित सदाबहार गाणी सादर केली. सायंकाळी ६:०० वाजता सुरू झालेल्या या मैफिलीने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. स्पर्धेतील उत्कृष्ट सादरीकरणासाठी विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते **रोख बक्षीस** देऊन गौरविण्यात आले. तसेच, सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या कौशल्याचे कौतुक म्हणून **प्रशस्तीपत्र** प्रदान करण्यात आले.

**02.10.2025** **महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन.**

आज 02 ऑक्टोबर 2025 रोजी साने गुरूजी रुग्णालय परिसरात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन रुग्णालय प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून कंत्राटदार श्री. अजय नेम्मानीवार हे उपस्थित होते. कार्यक्रमात दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. मेरसिंग चव्हाण यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, **"गांधीजींचे अहिंसेचे तत्त्व आणि शास्त्रीजींचे 'जय जवान, जय किसान' हे घोषवाक्य आजही आपल्याला प्रेरणा देतात."** *तर डॉ. बेलखोडे यांनी गांधीजी आणि आंबेडकर यांच्यातील देशाविषयी असलेल्या वैचारीक समानतेला विस्तृतपणे उलघडले.*

रुग्णालयातील कर्मचारी, रुग्ण आणि नागरिकांच्या उपस्थितीत शांत, सोज्वळ आणि प्रेरणादायी वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

**07.10.2025** **पारीख फाऊंडेशन, मुंबईचे श्री. भव्य शहा यांची साने गुरुजी रुग्णालयास सदिच्छा भेट**

मुंबई येथील प्रतिष्ठित पारीख फाऊंडेशनचे प्रतिनिधी श्री. भव्य शहा यांनी नुकतीच किनवट येथील साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली.

श्री. भव्य शहा यांनी रुग्णालयातील अद्ययावत वैद्यकीय सुविधा, अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅब आणि आपत्कालीन उपचार विभागाची पाहणी केली. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांना शहराच्या दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी संस्थेने केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या प्रसंगी रुग्णालय प्रशासनाशी चर्चा करताना, भविष्यातील सामाजिक उपक्रम आणि ग्रामीण आरोग्यासाठी असलेल्या संधींबाबत सकारात्मक विचारविनिमय करण्यात आला.

**11.10.2025** **जागतिक बालिका दिनानिमित्त साने गुरूजी रूग्णालयात जनजागृती उपक्रम.**

जागतिक कन्या दिन 2025 निमित्त "The girl I am, the change I lead: Girls on the frontlines of crisis– मी कोण आहे, मी घडवत असलेला बदल: संकटाच्या आघाडवीर असलेल्या मुली" या घोषवाक्याचा प्रचार करत साने गुरूजी रूग्णालयात जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमांतर्गत शहरातील प्रमुख ठिकाणी विशेष बॅनर लावण्यात आले, ज्यामध्ये मुलींच्या हक्कांचे संरक्षण, शिक्षण, आणि स्वप्नपूर्तीच्या दिशेने समाजाची जबाबदारी यावर भर देण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, त्यांचे हक्क, आत्मनिर्भरता आणि उज्ज्वल भविष्य यासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे हा होता.

**14.10.2025** **साने गुरुजी रुग्णालय, किनवट येथे श्री. सारंग कागलीवाल यांची प्री-ऑडिट भेट**

- **ऑडिट कालावधी:** १४ ऑक्टोबर २०२५ ते १६ ऑक्टोबर २०२५ (तीन दिवस, मुक्कामी).
- **ऑडिटरचे नाव:** श्री. सारंग कागलीवाल (प्रतिनिधी, PKF Shridhar and Shanthanam LLP).
- **संलग्न संस्था:** सर रतन टाटा फाउंडेशन.

सर रतन टाटा फाउंडेशनच्या निकषांनुसार साने गुरुजी रुग्णालयातील प्रशासकीय कामकाज, आर्थिक नोंदी आणि प्रकल्प अंमलबजावणीची पडताळणी करणे.

- **कागदपत्रांची पडताळणी:** रुग्णालयाचे परवाने, आर्थिक व्यवहार आणि तांत्रिक दस्तऐवजांची सखोल तपासणी करण्यात आली.
- **व्यवस्थापन:** रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि प्रकल्पाची प्रगती समाधानकारक असल्याचे दिसून आले.
- **मार्गदर्शन:** मुख्य ऑडिटसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याबाबत श्री. कागलीवाल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर प्री-ऑडिटमुळे रुग्णालयाच्या कामात पारदर्शकता आणि अचूकता राखण्यास मदत झाली आहे.

**14.10.2025** **नांदेड जिल्हा न्यायाधीश श्री. सुनीलजी वेदपाठक यांची साने गुरुजी रुग्णालयास सदिच्छा भेट**

नांदेड जिल्ह्याचे जिल्हा न्यायाधीश माननीय श्री. सुनीलजी वेदपाठक यांनी नुकतीच किनवट येथील साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयातील अद्ययावत वैद्यकीय सुविधा, पायाभूत सोयी-सुविधा आणि ग्रामीण भागातील रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांची सखोल पाहणी केली.

श्री. वेदपाठक यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेटी देऊन तेथील यंत्रसामग्री आणि रुग्णसेवेच्या दर्जाबद्दल समाधान व्यक्त केले. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅब आणि आपत्कालीन विभागाचे त्यांनी कौतुक केले. रूग्णालयातर्फे त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

साने गुरुजी रुग्णालयाद्वारे राबविण्यात येणारे विविध आरोग्य शिबिरे आणि सामाजिक उपक्रम हे खरोखरच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. बाबा आमटे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या या संस्थेच्या कार्याचा त्यांनी गौरव केला.

या प्रसंगी त्यांनी रुग्णालयाचे संस्थापक डॉ.अशोक बेलखोडे आणि व्यवस्थापनाशी संवाद साधला. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी अशा मल्टिस्पेशालिटी रुग्णालयांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या भेटीमुळे रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून, समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींच्या अशा भेटींमुळे संस्थेला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना डॉ. अशोक बेलखोडे यांनी व्यक्त केली. या प्रसंगी किनवट दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधिश तसेच अधिवक्ता संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

21.10.2025 **युवाशक्तीचे प्रेरणास्थान: डॉ. एस. एन. सुब्बाराव (भाईजी) यांना विनम्र अभिवादन**

**"जय जगत"** या घोषणेचे प्रणेते आणि गांधीवादी विचारवंत **पद्मश्री डॉ. एस. एन. सुब्बाराव (भाईजी)** यांचे जीवन म्हणजे राष्ट्रसेवा आणि सद्भावनेचा एक आदर्श वस्तुपाठ आहे. भारत जोडो अभियान आणि युवा शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी पिढ्यानपिढ्या तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्योत तेवत ठेवली.

चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. 'महात्मा गांधी सेवा आश्रम' आणि विविध राष्ट्रीय सेवा योजनांच्या माध्यमातून त्यांनी युवकांना श्रमदान आणि सामाजिक कार्याची गोडी लावली. 'भारत जोडो' सायकल यात्रा आणि विविध भाषांमधील गीतांच्या माध्यमातून त्यांनी देशाला एका सूत्रात बांधण्याचे काम केले.

भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरुजी रुग्णालय परिवाराच्या वतीने, भाईजींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करून त्यांच्या स्मृतीस त्रिवार अभिवादन करण्यात आले यावेळी भाईजींचे सहकारी असलेले श्री. नरेंद्र वडगांवकर यांनी त्यांच्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली तर संस्थेचे अध्यक्ष डॉ. बेलखोडे यांनी भाईजींच्या विचारांनी देशाला नव्या दृष्टीकोनातून पाहणे शिकविले असे प्रतिपादीत केले.

**18.10.2025** **आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दिवाळी भेट**

किनवट – नाम फाऊंडेशन, भारत जोडो युवा अकादमी व महालक्ष्मी मंदीर ट्रस्ट, मुंबई **यांच्या संयुक्त विद्यमाने** किनवट, माहूर व हिमायतनगर तालुक्यातील **५०** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना **दिवाळी भेट** म्हणून साडी-चोळी व फराळाचे साहित्य त्यांच्या घरी जाऊन वितरित करण्यात आले.

या उपक्रमामागचा उद्देश म्हणजे सणाच्या काळात दु:खग्रस्त कुटुंबांना आधार देणे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणणे आणि समाजात एकोप्याचा संदेश पोहोचवणे हा होता.

**सामाजिक संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण ठरलेल्या या उपक्रमाचे** स्थानिक पातळीवर सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. भेटवस्तू वाटप करताना स्वयंसेवकांनी कुटुंबांशी संवाद साधत त्यांच्या भावना समजून घेतल्या व मानसिक आधारही दिला.

**01.12.2025** **साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम**

दिनांक **01 डिसेंबर 2025** रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे **जागतिक एड्स दिन** निमित्त विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे एड्स विषयी माहिती देऊन लोकांमध्ये या रोगाविषयी जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी आणि रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते. यावेळी एड्स प्रतिबंध, लक्षणे, उपचार आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर माहिती दिली गेली. तसेच एड्सग्रस्तांचे समाजात होणारे भेदभाव कमी करण्यासाठी संवेदनशीलता वाढविण्यावरही भर देण्यात आला.

**06 डिसेंबर 2025** **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या **69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त** साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचा उद्देश बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संविधान निर्मितीमधील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात **बुद्ध वंदनेने** झाली. त्यानंतर **अजिंक्य कयापाक** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

त्यांनी आंबेडकरांच्या सामाजिक समतेचा विचार, संविधानातील त्यांच्या भूमिका आणि शिक्षणासाठीच्या लढ्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमातून सामाजिक न्याय, समता व बंधुतेच्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर, संजय बोलेनवार, विकास बोलेनवार, परमेश्वर कदम, विपीन पवार, शेकन्ना बंडेवार, नितीन भडंगे, कशिश निकोडे, प्रणाली निकोडे यांच्यासह साने गुरूजी रुग्णालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात डॉ. अशोक बेलखोडे, विकास बोलेनवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तेजस्वीनी उईके यांनी केले तर परमेश्वर कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**20.12.2025** **संत गाडगे बाबा पुण्यतिथी निमित्त अभिवादन**

दिनांक **20 डिसेंबर 2025** रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे महान सामाजिक कार्यकर्ते आणि संत **गाडगे बाबा** यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासह कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक या कार्यक्रमात उपस्थित होते.

कार्यक्रमात संत गाडगे बाबा यांच्या सामाजिक सेवा, स्वच्छता अभियान आणि लोककल्याणासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे महत्त्व सांगितले आणि त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाद्वारे सामाजिक समता, स्वच्छता आणि सेवा भावना वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**24.12.2025** **साने गुरूजी जयंती व साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलचा लोकार्पण सोहळा**

दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी साने गुरूजींच्या जयंतीचे औचित्य साधून संस्थेने साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल MIDC कोठारी चे लोकार्पण केले. या लोकार्पण सोहळयासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची हजेरी होती. लोकसहभागाच्या बळावर उभे राहिलेले सानेगुरुजी इमर्जन्सी अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल हे केवळ उपचारांचे केंद्र नसून दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांसाठी आशेचा किरण आणि सामाजिक बांधिलकीचे सशक्त प्रतीक आहे, असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका **मेधा पाटकर** यांनी केले. **पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने** व **पद्मश्री डॉ. अभय बंग** यांच्या प्रमुख उपस्थितीत या रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

दिनांक 24 डिसेंबर रोजी पार पडलेल्या लोकार्पण समारंभात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश **सुनील वेदपाठक** यांनी हा सोहळा समाजाला दिशा देणारा व प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी रुग्णालयाचे संस्थापक **डॉ. अशोक बेलखोडे** यांच्या सामाजिक जाणिवेतून उभ्या राहिलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक **श्री. माधव बावगे** यांनी केले. आपल्या मनोगतात डॉ. अशोक बेलखोडे म्हणाले की, *“रुग्णसेवा हा केवळ व्यवसाय नसून समाजाप्रती असलेले पवित्र कर्तव्य आहे. दुर्गम व आदिवासी भागातील सामान्य नागरिकांनाही दर्जेदार, सुलभ व परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, यासाठी हा प्रकल्प उभा राहिला आहे.” या प्रकल्पाच्या उभारणीत*

*अगदी 50 रूपयांपासून 1 कोटी रूपयांपर्यंत देणगी मिळाली आहे. या उभारणीत रमा पुरूषोत्तम फाऊंडेशन, हंसराज दामोदर चॅरीटेबल ट्रस्ट, आयडीबीआय बँक, बजाज ऑटो लिमिटेड या व अशा अनेक दानशूरांनी प्रकल्पासाच्या उभारणीत हातभार लावला आहे.*

मेधा पाटकर यांनी डॉ. बेलखोडे यांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांची ध्येयवादी वृत्ती, सातत्यपूर्ण परिश्रम व लोकसहभाग यामुळे आदिवासी भागात एक भक्कम आरोग्यसंस्था उभी राहिली आहे. हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकसहभागातून उभे राहिलेले हे विस्तारित रुग्णालय आदिवासी व दुर्गम समाजासाठी आरोग्यसेवेचा नवा मानदंड ठरेल. *"रुग्णालय म्हणजे केवळ उपचाराचे ठिकाण नसून माणुसकी, सेवा आणि संवेदनशीलतेचे केंद्र असले पाहिजे,"* असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

डॉ. तात्याराव लहाने यांनी आपल्या अनुभवातून आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, आयुष्यातील गंभीर आजारपणाच्या टप्प्यातून मला उत्तम आरोग्यसेवेचे खरे मोल उमगले. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला चांगली व परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.

या लोकार्पण सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, देणगीदार, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप काळे व प्रा. डॉ. शारदा कदम यांनी व प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले.

**24.12.2025**

### कै. उत्तमराव राठोड स्मृती संगीत महोत्सव

**सायंकाळी 7.00 ते 10.00 या वेळेत स्व. उत्तमरावजी राठोड स्मृती संगीत महोत्सव** भव्यदिव्य स्वरूपात पार पडला. यात झी सारेगमप, संगित सम्राट विजेत्या, इंडियन आयडॉल फेम, क्लासिकल व्हाईस ऑफ इंडिया सुप्रसिद्ध गायिका अंजली गायकवाड व नंदिनी गायकवाड भगिनी यांनी आपली संगीतमय कला सादर करत रसिकांची मनं जिंकली. या कार्यक्रमात मराठी, हिंदी गाणी सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात कु. इशीता वंदना शिरीष पत्की (इयत्ता 10 वी, भूमिकन्या, किनवट) यांनीही आपल्या मधुर आवाजाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

**25.12.2025**

### बाबा आमटे स्मृती व्याख्यानमाला - "कायदा अंधश्रध्दा निर्मुलनाचा"

जादूटोणा कायदा सर्वसामान्य पर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. या कायद्याविषयी जनसामान्यापर्यंत माहिती देण्याची जबाबदारी ही शासनाने घ्यावी असे मत साने गुरुजी जयंती व साने गुरुजी रुग्णालयाच्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त पद्मश्री बाबा आमटे स्मृती व्याख्यानमालेत किनवट येथे महाराष्ट्र विवेक वाहिनी व अनिस च्या प्रसिद्ध कार्यकर्त्या प्राचार्य डॉ. सविता शेट्टी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ रोडे, प्रमुख व्याख्याते म्हणून प्राचार्या डॉ .सविता शेट्टी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे हे विचार मंचावर उपस्थित होते. प्रारंभी पूज्य वंदनीय साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.पुढे बोलतांना शेट्ये मॅडम म्हणाल्या श्रध्दा आणि अंधश्रद्धा हे समजावून घेतले पाहिजे.खरे पहात जादूटोना विरोधी कायदा व्हावा ही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक स्मृतीशेष डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची मागणी होती. त्यांच्या निधनानंतर हा कायदा शासने सुरू केला आहे.आज हा कायदा महाराष्ट्र,गुजरात, कर्नाटक या राज्यांत लागू आहे. हा कायदा राष्ट्रीय स्तरावर लागू करून कायद्या विषयी नियम व अटी खेड्या पाड्यात समजावून सांगण्याची जबाबदारी ही शासनाने घ्यावी. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही या कायद्याविषयी जनजागृती करतच आहे पण ती शासनाने सुध्दा करावे असे मत व्यक्त केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांनी विविध प्रात्यक्षिके करून दाखविले,आपली दिशाभूल कशी केली जाते या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष डॉ.अशोक बेलखोडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गजानन सोनोने तर आभार डॉ.पंजाब शेरे यांनी मानले.या प्रसंगी किनवट शहरातील पाटील अकादमी पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र ,किनवट, राठोड अकादमी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,किनवट चे विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.

**25.12.2025** **साने गुरुजी जयंती निमित्त कवी संमेलन**

“कवितेतून मानवतेचे चिंतन व्हावे, संवेदनांना जाग यावी; वास्तवाचे बी पेरून प्रबोधन व्हावे” असे स्पष्ट मत प्रसिद्ध कवी अनंत विठ्ठल राऊत यांनी व्यक्त केले. साने गुरुजी जयंती व साने गुरुजी रुग्णालयाच्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त तसेच साने गुरुजी मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या लोकार्पणाचे औचित्य साधून आयोजित भव्य कवी संमेलनात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गुलाबी थंडीत रंगलेल्या साहित्यसोहळ्याला काव्यमय गारवा लाभला. विचारमंचावर कवी प्रकाश घोडके (अध्यक्ष), प्रभाकर साळेगावकर, भारत सातपुते आणि डॉ. विनायक पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

अनंत राऊत यांनी “दु:ख अडवायला उंबऱ्यासारखा… मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा” ही हृदयस्पर्शी कविता सादर करत मानवी नात्यांची ऊब जागवली. पुढे सामाजिक विषमता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि मानवी हक्क या संदर्भातील प्रभावी ओळींनी रसिक थक्क केले. "मी तुकोबा माणसाच्या आत पेरत चाललो…" या कवितेने तर सभागृहात टाळ्यांचा गजर घडवला.

साळेगावकर यांनी “बळ उड्या दे रे सूर्य हाती यावा…” सारख्या प्रभावी रचना मांडत कवितेच्या विविध आकृतीबंधांवर प्रकाश टाकला. डॉ. विनायक पवार यांनी शेतकरी व प्रेम कवितांनी वातावरण भारून टाकले. भारत सातपुते यांनी मानवी जीवनाचे वास्तव काव्यातून उभे केले, तर प्रसिद्ध गीतकार प्रकाश घोडके यांनी “तु दाराहून जाताना…” ही सामाजिक आशय असलेली भावकविता सादर करीत कार्यक्रमाला माधुर्य दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पंजाब शेरे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. सुनिल व्यवहारे यांनी केले.

या प्रसंगी डॉ. अशोक बेलखोडे, माधव बागवे, सविता शेट्ये, डॉ. भाग्यश्री वरटकर, योगाचार्य अखिल खान, प्रा. गजानन सोनोने, पत्रकार मिलिंद सरपे यांसह कवी, साहित्यप्रेमी आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कविसंमेलनाच्या ओघवत्या रचना व सामाजिक जाणिवांनी रसिक मंत्रमुग्ध झाले.

**26.12.2025** **साने गुरूजी जयंती व साने गुरूजी रूग्णालयाच्या वर्धापन दिनानिमीत्त “महाराष्ट्र ग्रामीण बँक” पुरस्कृत चित्रकला स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद**

किनवट येथे साने गुरूजी जयंती व साने गुरूजी रूग्णालयाच्या 30 व्या वर्धापन दिनानिमीत्त शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन दिनांक 26 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल MIDC किनवटच्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते.

या सोहळ्याचे उद्घाटन चित्रकार कविता जोशी, नांदेड कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यार्थीनी कु. काव्या किशोर पवार व प्रमुख पाहूणे यांनी दीपप्रज्वलन व साने गुरूजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन भारत जोडो सायकल यात्री बाबासाहेब सुर्यवंशी, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा किनवटचे प्रतिनिधी, विलास भांजे, दत्ता शिंदे, शुभांगी आबनावे, पुरूषोत्तम जोशी, डॉ. ए. डी. जोशी, प्रमोद करंदीकर, नाशिक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक डॉ. अशोक बेलखोडे यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक पुरस्कृत चित्रकला स्पर्धेचे उद्घाटन कलाशिक्षीका कविता जोशी, नांदेड यांनी चित्र काढुन केले. बाबराव सुर्यवशी व डॉ. अशोक बेलखोडे यांनी विविध भाषेतील भारत जोडो चे नारे विद्यार्थ्यांना शिकविले या चित्रकला स्पर्धेमध्ये किनवट व परिसरातील एकुण 1000 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाला मुरलीधर बेलखोडे- निसर्ग सेवा समिती वर्धा, प्राचार्य सुभाष काळे, मुख्याध्यापक प्रेमचंद बशी, पवार सर, एम. डी. अभंगे सर, दिपक डंबाळे, भैय्याजी बेलखोडे, सुरेखाताई आंबटकर, अश्विनी उईके यांच्यासह विविध शाळेचे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीयतेसाठी साने गुरूजी रूग्णालयाचे सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**26.12.2025** **बाबा आमटे यांची जयंती साजरी**

साने गुरूजी रुग्णालयात बाबा आमटे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात रुग्णालयातील सर्व कर्मचारी, रुग्ण व गावातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान बाबा आमटे यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण करून त्यांच्या मानवतेच्या संदेशावर भर देण्यात आला.

**26.12.2025** **सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन**

किनवट येथे साने गुरूजी जयंती व साने गुरूजी रूग्णालयाच्या 30 व्या वर्धापन दिनानिमीत्त शालेय विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक स्पर्धेचे दिनांक 26 डिसेंबर 2025 साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल MIDC कोठारी येथे आयोजन करण्यात आले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमात किनवट तालुक्यातील विविध शाळेतील शालेय विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली.

**11.01.2026** **स्व. शांताबाई वामनराव बेलखोडे यांचे स्मृतिदिन**

दिनांक 11 जानेवारी 2026 रोजी साने गुरूजी रूग्णालयाचे संस्थापक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या मातोश्री स्व. शांताबाई वामनराव बेलखोडे यांच्या तिसऱ्या स्मृतीदिनानिमीत्त अभिवादन करण्यात आले.

आईच्या स्मृतीदिनानिमीत्त साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सर्व सदस्यांनी त्यांच्याबद्दल असलेल्या आपापल्या भावना व्यक्त केल्या.

**03.01.2026 ते 12.01.2026**

**किनवट तालुक्यात 'साऊ ते जिजाऊ' अभियान ; २५ गावांतील ४०० रुग्णांना मोफत आरोग्य सेवा.**

आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीपासून ते स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून, भारत जोडो युवा अकादमी संचलित **साने गुरुजी ईमर्जन्सी आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल**

**(MIDC कोठारी)** व डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या **'साऊ ते जिजाऊ'** आरोग्य तपासणी अभियानाची नुकतीच यशस्वी सांगता झाली. १२ जानेवारी रोजी मौजे पळशी ता. किनवट येथे समारोपीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे अभियान ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ या १० दिवसाच्या कालावधीत राबविण्यात आले. किनवट तालुक्यातील अत्यंत दुर्गम आणि आदिवासी समजल्या जाणाऱ्या २५ गावांमध्ये फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून आरोग्य सेवा पोहोचवण्यात आली. या १० दिवसांच्या उपक्रमात एकूण **४०० रुग्णांची** मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले. यामध्ये २४७ महिला आणि ५४ पुरुषांचा समावेश होता. तसेच, जिल्हा परिषद शाळा येंदा आणि धामणदरी येथील **९९ विद्यार्थ्यांची** विशेष आरोग्य व दंत तपासणी करण्यात आली.

शिबिरामध्ये केवळ प्राथमिक तपासणीच नव्हे, तर तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली दंतरोग, फिजिओथेरपी (भौतिकोपचार) आणि आयुर्वेदिक उपचार पद्धतींचाही लाभ रुग्णांना देण्यात आला. प्रामुख्याने ताप, सर्दी, खोकला, सांधेदुखी आणि महिलांच्या विशेष आजारांवर या अभियानात सखोल मार्गदर्शन व उपचार करण्यात आले.

**पळशी येथे अभियानाचा समारोप**

अभियानाचा शेवटचा टप्पा १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मौजे पळशी येथील ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला. या समारोपीय शिबिरात ७० रुग्णांनी आपला सहभाग नोंदवला. यावेळी साने गुरुजी हॉस्पिटलच्या डॉ. प्रगती पवार, डॉ. शिवानी बेलखोडे (फिजिओथेरपी), डॉ. दुर्गा काकडे (आयुर्वेद), डॉ. विद्या गोलकोंडावार (दंतरोग) यांनी रुग्ण सेवा दिली.

या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी परिचारिका सपना तामगाडगे, रितू कयापाक, कशीष निकोडे, वाहन चालक नागेश देवतळे, समुपदेशक अजय वल्हेवार आणि अजय जाधव यांनी परिश्रम घेतले. पळशीच्या सरपंच मंगलाताई नैताम, ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील युवक-महिलांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

26.01.2025

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे 77 वा प्रजासत्ताक दिन साजरा**

**77 व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त** साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, किनवट येथे **भारत जोडो युवा अकादमी**च्या वतीने **ध्वजारोहण सोहळा** आयोजित करण्यात आला. ध्वजारोहण **डॉ. अशोक बेलखोडे** यांच्या हस्ते संपन्न झाले.

तसेच संस्थेच्या साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट , साने गुरूजी कला महाविद्यालय, ईस्लापूर, साने गुरूजी प्रायमरी इंग्लीश स्कुल, बोधडी येथेही ध्वजारोहन पार पडले. कार्यक्रमाला डॉ. भाग्यश्री बेलखोडे**,** डॉ. योगेंद्र वरटकर**,** डॉ. विजय काळे**,** बाबासाहेब सुर्यवंशी**,** यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील विद्यार्थी, रुग्णालयातील सर्व कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी **राष्ट्रीय गीत** गात **"भारत माता की जय"** अशा देशभक्तिपूर्ण घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. यानंतर डॉ. बेलखोडे आणि प्रमुख पाहुण्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, शिक्षण आणि आरोग्य सेवेच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचे व संविधानाचे योगदान आणि नागरिकांच्या कर्तव्यांवर प्रकाश टाकणारे मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर उपस्थित विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना **खाऊ वाटप** करण्यात आले.
हा उत्सव **राष्ट्रीय एकता, बंधुता आणि देशभक्तीचा** प्रतीक ठरला.

30.01.2026

**महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीला साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे अभिवादन**

भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने आज महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात अनेक सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि संस्था प्रतिनिधींनी उपस्थित राहून महात्मा गांधींच्या जीवनप्रवास आणि त्यांच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या तत्त्वांचा गौरव केलाउपस्थितांनी गांधीजींना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या विचारांना जीवनात पाळण्याचे संकल्प घेतले.

कार्यक्रमात साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्राच्या व्यवस्थापनाने महात्मा गांधींच्या कार्याची आठवण करून देणारी भाषणे दिली तसेच गांधीजींच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजातील समस्यांवर चर्चा केली.

भारत जोडो युवा अकादमीचे कार्यकर्ते व स्थानिक नागरिक या कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी झाले आणि महात्मा गांधींच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले.

**07.02.2026** **स्व. वामनराव बेलखोडे यांचे स्मृतिदिन**

दिनांक 07 फेब्रुवारी 2026 रोजी साने गुरूजी रूग्णालयाचे संस्थापक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या वडिल स्व. वामनराव बेलखोडे यांच्या स्मृतीदिनानिमीत्त अभिवादन करण्यात आले.

**15.02.2026** **साने गुरूजी रूग्णालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी**

15 फेब्रुवारी 2026 रोजी भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या श्रद्धेने साजरी करण्यात आली.

संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी गावातील प्रतिष्ठीत नागरिक आणि साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. विपीन पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली आणि त्यांचे कार्य सामाजिक हितासाठी किती महत्त्वपूर्ण होते, यावर प्रकाश टाकला.

संत सेवालाल महाराज यांच्या जीवनप्रवासाने सर्वांना प्रेरणा दिली असून, त्यांची जयंती साजरी करण्याचा हा एक खास उपक्रम ठरला.

***19.02.2026*** **साने गुरूजी रूग्णालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी**

*साने गुरूजी रूग्णालय* मध्ये 19 फेब्रुवारी 2026 रोजी महाराष्ट्राचे दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावर्षी जयंतीला विशेष रंगत आली, कारण कार्यक्रमात महापुरुषाच्या कार्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली आणि त्यांचे विचार समजून घेण्यासाठी अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींचा सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेब सुर्यवंशी यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांवर प्रकाश टाकला आणि त्यांचे राज्यकारभार, युद्धकलेतील कौशल्य, तसेच समाजातील न्याय आणि समता यावर लक्ष केंद्रित केले.

त्यानंतर डॉ. अशोक बेलखोडे यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, त्यांची प्रेरणादायक नेतृत्वशक्ती आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सामाजिक बदलांवर विचार मांडले. मनोज चनमनवार आणि विकास बोलेनवार यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायक जीवनाचा उल्लेख केला आणि त्यांच्या संकल्पनेचा समाजाच्या विविध स्तरांवर कसा प्रभाव पडला, याबद्दल सांगितले.

कार्यक्रमात डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. पवार, डॉ. विजय काळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत नागरिक, साने गुरूजी रूग्णालयातील कर्मचारी आणि रूग्णांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत समर्पक आणि प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची महती जाणून घेतली आणि त्यांना आदरांजली वाहिली. तसेच, सर्व उपस्थितांनी आपल्या जीवनात शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला.

**20.02.2026** **रमा पुरूषोत्तम फाऊंडेशनची साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलला भेट**

दिनांक 20 फेब्रुवारी 2026 रोजी रमा पुरूषोत्तम फाऊंडेशनचे हेमाद्री बुझरूक, चित्रा बुझरूक, प्रल्हाद देशपांडे, श्रीपाद जोशी यांनी भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल MIDC कोठारी येथे भेट दिली. यावेळी त्यांच्यासह आर्किटेक्ट गौतम मेहता, अमेय समेळ, हितेश शहा, संस्थेचे अध्यक्ष, डॉ. अशोक बेलखोडे सचिव माधव बावगे यांच्यासह रूग्णालयातील त्या त्या विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थितीती होती.

**20.02.2026** **जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांची साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलला भेट**

भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, एम.आय.डी.सी. कोठारी येथे मा. जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले, सहायक जिल्हाधिकारी श्री. जेनितचंद्र दोन्तुला, तहसिलदार डॉ. शारदा चौंडेकर, यांनी हॉस्पीटलला भेट दिली यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे सचिव श्री. माधव बावगे यांनी मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी निसर्ग सेवा समिती वर्धा चे श्री मुरलीधर बेलखोडे, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. वसंत राठोड, डॉ. भाग्यश्री बेलखोडे- वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. मानसी व्यवहारे, डॉ. शिवाणी बेलखोडे आदि उपस्थित होते.

**20.02.2026** **किनवट येथील साने गुरुजी रुग्णालयात 'मणका निदान शिबिर' संपन्न; ७५ रुग्णांनी घेतला मोफत लाभ**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा मिळाव्यात, या उदात्त हेतूने किनवट येथे आयोजित करण्यात आलेले मोफत मणका निदान शिबिर उत्साहात पार पडले. भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि **द स्पाइन फाउंडेशन, मुंबई** यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या शिबिरात किनवट आणि माहूर तालुक्यातील एकूण ७५ रुग्णांनी आपली मोफत आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये २९ पुरुष आणि ४६ महिला रुग्णांचा समावेश होता. मणक्याच्या आजारांमुळे त्रस्त असलेल्या ग्रामीण भागातील रुग्णांना या शिबिराच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले.

देशातील आघाडीचे मणके शस्त्रक्रिया तज्ज्ञ **डॉ. शेखर भोजराज (मुंबई)** यांनी या शिबिरात स्वतः रुग्णांना मार्गदर्शन केले. भारत जोडो युवा अकादमीचे **डॉ. अशोक बेलखोडे** यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर नियोजित करण्यात आले होते. डॉ. भोजराज यांच्यासोबत डॉ. प्रेमिक नागड, डॉ. मयुरेश रामपूरकर आणि डॉ. गोविंद शिंदे या तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने प्रत्येक रुग्णाची बारकाईने तपासणी करून त्यांना योग्य औषधोपचार आणि व्यायामाचा सल्ला दिला.

शिबिरामध्ये प्रामुख्याने खालील तक्रारी असलेल्या रुग्णांवर विशेष लक्ष देण्यात आले:

- **तीव्र मान आणि पाठदुखी:** चुकीची बसण्याची पद्धत किंवा श्रमाच्या कामामुळे होणारे विकार.
- **मणक्याची झीज (Spondylosis):** वाढत्या वयानुसार होणाऱ्या समस्या.
- **बधिरता:** हाता-पायांना मुंग्या येणे किंवा हालचालीत अडथळा निर्माण होणे.

मुंबईसारख्या मोठ्या शहरात मिळणारे तज्ज्ञ उपचार स्थानिक स्तरावर आणि तेही मोफत उपलब्ध झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले. साने गुरुजी हॉस्पिटलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने हे शिबिर एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

21.02.2026

**"कर्मयोगी बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार" प्राप्त माधव बावगे यांचा किनवटमध्ये भव्य सत्कार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे (लातूर) यांना नुकताच प्रतिष्ठेचा "कर्मयोगी बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार" मिळाल्यानंतर त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला.
साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी चि.(ता. किनवट) येथे २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित कार्यक्रमात बावगे यांचा मानपत्र, शाल, श्रीफळ पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. हा सत्कार हॉस्पिटलचे मुख्य डॉ. अशोक बेलखोडे, ज्येष्ठ समीक्षक व विचारवंत प्रा. रामप्रसाद तौर, 'सकाळ', वृत्तपत्र समूहाचे बातमीदार ॲड.मिलिंद सर्पे, प्रा. डॉ. सुनील व्यवहारे, बाबासाहेब सूर्यवंशी व संपूर्ण कर्मचारी वृंद यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनील व्यवहारे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. बाबा सूर्यवंशी यांनी प्रभावीपणे पार पाडले. सन्मानपत्राचे वाचन विकास बोलेनवार यांनी केले. कार्यक्रमात अनेक संस्था व व्यक्तींनी माधव बावगे यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

आपल्या उत्तरपर भाषणात माधव बावगे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. समाज प्रबोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक मूल्यांचा प्रसार हेच आपल्या कार्याचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास डॉ. भाग्यश्री बेलखोडे, डॉ. योगेंद्र वरटकर, कल्लोळकार डॉ. वसंत भा. राठोड, प्राचार्य डॉ. शिवाजी बेंबरेकर, उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे, दिलीप पाटील, वंदना ऊईके, संजय बोलेनवार, मनोज चनमनवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. अशोक बेलखोडे यांनी केला, तर आभार प्रदर्शन अजय जाधव यांनी मानले.

**06.03.2026** **माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे सर यांना अभिवादन**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, लातूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष, माजी राज्यसभा सदस्य, जेष्ठ साहित्यीक, विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे सर यांना भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे आदरांजली अपर्ण करण्यात आली या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, विचारवंत प्रा. रामप्रसाद तौर सर, प्रा डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. आनंद भालेराव, रामतीर्थकर सर, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, प्रा. डॉ. वसंत राठोड, डॉ. विजय काळे, प्रा. डॉ. पंजाब शेरे, ज्ञानेश्वर उईके, डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर, डॉ. शिवाणी बेलखोडे यांच्यासह रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**08.03.2026** **जागतिक महिला दिनानिमित्त 'नवरत्नांचा' गौरव आणि मोफत आरोग्य शिबीर**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येत्या **८ मार्च २०२६** रोजी सकाळी 10.00 वाजता पासून विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ९ कर्तबगार महिलांचा (नवरत्नांचा) गौरव केला जाणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष **डॉ. अशोक बेलखोडे** यांनी दिली आहे.

महिलांच्या आरोग्याप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठी एम.आय.डी.सी. नांदेड रोडवरील साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथे हे भव्य आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात तालुक्यातील सर्व महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून विनामूल्य आरोग्य तपासणी आणि सल्ला दिला जाणार आहे.

केवळ आरोग्यच नव्हे, तर समाजाच्या विविध स्तरांत आपल्या कतृत्वाने ठसा उमटवणाऱ्या महिलांना सन्मानित करण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे. यामध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, आरोग्य सेविका, बचतगट अध्यक्ष, आरोग्य पर्यवेक्षिका, शिक्षिका, महिला सरपंच अशा एकूण **९ कर्तबगार महिलांचा** विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहित केले जाणार आहे.

किनवट परिसरातील सर्व महिलांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा आणि नवरत्न सत्कार सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांनी केले आहे.

**14.03.2026** **किनवटमध्ये साने गुरुजी रुग्णालयात भव्य मोफत आयुर्वेदिक शिबिर संपन्न**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, कोठारी येथे शनिवार, १४ मार्च २०२६ रोजी प्रथमच भव्य आयुर्वेदिक रोग निदान व उपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात ३६ हून अधिक रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना आयुर्वेदिक उपचार व मार्गदर्शनाचा लाभ देण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन आदिलाबाद येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ **डॉ. ज्ञानेश्वर कोथळे** आणि पुसद येथील **डॉ. विलास माहुरे** यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. प्रारंभी उपस्थित डॉक्टरांचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष रुग्ण तपासणीला सुरुवात झाली.

या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ नाडी परीक्षणच नाही, तर आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला.

- **Video Dermoscopy:** याद्वारे केस आणि त्वचेचे सूक्ष्म परीक्षण करण्यात आले.
- **पंचकर्म उपचार:** तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली **अग्निकर्म** आणि **विद्धकर्म** यांसारख्या प्रभावी आयुर्वेदिक उपचार पद्धतींचा वापर करण्यात आला.

- **सवलत:** गरजू रुग्णांना अत्यंत सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध करून देण्यात आली.

संस्थेचे संचालक **डॉ. अशोक बेलखोडे** आणि मानव संसाधन व्यवस्थापक **बाबासाहेब सूर्यवंशी** यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर पार पडले. आयुर्वेदिक विभाग प्रमुख **डॉ. शिरीष पत्की** आणि **डॉ. दुर्गा काकडे** यांनी शिबिराचे संयोजन केले. रुग्णसेवेसाठी डॉ. श्रद्धा गावंडे, डॉ. वैष्णवी पद्मावार, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे, बालरोग तज्ज्ञ डॉ. योगेंद्र वरट्कर, डॉ. शिवानी बेलखोडे आणि फिजिओथेरपिस्ट डॉ. विद्या गोलकोंडावार यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी अजय वल्हेवार, अजय जाधव, नेहा गीते, नेहा आडे आणि वाहन चालक संगमेश्वर रोडगे यांनी गेल्या आठ दिवसांपासून अथक परिश्रम घेतले. रुग्णांची नोंदणी प्रिया पाटील यांनी केली, तर संपूर्ण वृत्तांकन प्रमोद राठोड यांनी केले.

किनवट परिसरात अशा प्रकारचे केवळ आयुर्वेदावर आधारित शिबिर पहिल्यांदाच झाल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे मोठे कौतुक केले आहे.

17.03.2026

## इफ्तार पार्टीचा आयोजन: साने गुरूजी रूग्णालयाकडून एकतेचा संदेश

येथील भारत जोडो युवा अकादमी संचलित, **साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र किनवट** तर्फे आज १७ मार्च २०२६ रोजी रुग्णालयाच्या सभागृहात एका भव्य **इफ्तार पार्टीचे** आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ‘सर्व धर्म समभाव” हा विचार अधोरेखित करत सामाजिक एकता आणि बंधुत्वाचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी **मौलाना सादत साब** यांनी रमजान महिन्याचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, "रमजान हा महिना केवळ उपासनेचा नसून पुण्यकर्मात वृद्धी करण्याची आणि गोरगरीब, गरजू लोकांना मदत करण्याची मोठी संधी आहे." मानवी सेवा हीच खरी ईश्वरी सेवा असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले. यावेळी कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष इसाखान, के.मुर्ती, उपनगराध्यक्ष हसन लाला, राघु मामा, जहिर खान, शेख अली, इनायत भाटी, निसार भाटी, नसिर तगाले, बाबा साहेब सुर्यवंशी, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. भाग्यश्री बेलखोडे, संकेत आंबटकर यांच्यासह साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सदस्य, कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थित होती.

समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी **डॉ. अशोक बेलखोडे** आणि साने गुरुजी रुग्णालय परिवार सातत्याने प्रयत्नशील असतो. दरवर्षी रुग्णालयाने अशा इफ्तार पार्टीचे आयोजन करून समाजात एकात्मतेची बीजे पेरली आहेत, अशा शब्दांत उपस्थितांनी रूग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सर्वांनी मिळून **'सामूहिक दुआ'** केली. यामध्ये देशात व समाजात कायम शांतता, समृद्धी आणि सद्भावना राहावी, अशी प्रार्थना करण्यात आली. शेवटी डॉ. अशोक बेलखोडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

17.03.2026

## लखन कनाके यांचा साने गुरूजी रूग्णालयातर्फे सत्कार

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सांस्कृतीक विभागाच्या संघाने राष्ट्रीय पातळीवर अखिल भारतीय आंतरविद्यापीठ चेन्नई येथे पार पाडलेल्या (सत्यभामा युनिवर्सिटी) येथे पार पडलेल्या स्पर्धेत 6 पारितोषके प्राप्त केले. समुह नृत्य स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त करून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ पात्र ठरला आहे. या संघात किनवट व माहूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता हे विशेष. कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन

केंद्राचा विद्यार्थी लखन लक्ष्मीबाई भारत कनाके याचा या स्पर्धेत सहभागी होत्या त्याचे भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र व साने गुरूजी रूग्णालय परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**28.03.2026** **भव्य नेत्ररोग तपासणी व उपचार शिबीर**

भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, MIDC, कोठारी ता. किनवट येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या नेत्र रोग तपासणी आणि उपचार शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सदर भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिर दि. 28 मार्च २०२६ रोजी हॉस्पिटलचे संचालक मा. डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरात जावे लागू नये, या उद्देशाने त्यांच्या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये आर्णी येथील सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ डॉ. तेजस केशववार यांच्यासह त्यांचे सहयोगी सिद्धेश केशववार, सोनल दासरवार, कोमल बोबडे साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल मधील स्त्रीरोग तज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. दुर्गा काकडे, डॉ. विद्या गोलकोंडावार, डॉ. शिवानी बेलखोडे यांनीही शिबिरात सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये मोतीबिंदू, काच बिंदू, डोळ्यातील तिरळेपना, चष्माचे नंबर आणि शस्त्रक्रिया गरजू रुग्णांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरामध्ये एकूण 55 रुग्णांची तपासणी केली असता त्यामध्ये 26 रूग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र झाले आहेत आणि 13 रुग्ण यांना चष्म्याचे नंबर काढून दिले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा गित्ते शिबिरांचे प्रास्तविक डॉ .विद्या गोलकोंडावार यांनी केले, तर आभार प्रदर्शन अजय जाधव यांनी केले.

नेत्र शिबिर यशस्वी करण्यासाठी साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल मधील सर्व कर्मचारी यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@ **THANK YOU** @@@@@@@@@@@@@@@@@@@@@@